# भारतीय संघाच्या जयजयकाराने
# क्रिकेटची पंढरी दुमदुमली...!


रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १६ ◆ अंक ३४८
www.ramprahar.com

# राम प्रहर

शुक्रवार, ५ जुलै २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २






- वर्ल्डकप विजेत्या शिलेदारांची मुंबईत जंगी मिरवणूक
- मरीन ड्राईव्हवर क्रिकेटप्रेमींचा जनसागर उसळला
- वानखेडे स्टेडियममध्ये विश्वविजेत्यांचा हृद्य गौरव

**मुंबई : प्रतिनिधी**

**ट्वेन्टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेचे जेतेपद जिंकून मायदेशी आगमन झालेल्या भारतीय संघाचे गुरुवारी (दि. ४) मुंबईत जंगी स्वागत करण्यात आले. टीम इंडियाच्या स्वागताला वरुणराजानेही हजेरी लावली. पावसाच्या हलक्या सरी चाहत्यांचा उत्साह वाढवत होत्या. या वेळी मरीन ड्राईव्हवरून वानखेडे स्टेडियमवर काढलेल्या विजयी मिरवणुकीत खेळाडूंचे कौतुक करण्यासाठी लाखो क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.**

रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम लढतीत दक्षिण आफ्रिकेचा सात धावांनी पराभव करून जेतेपद पटकावले. या विश्वविजेत्या संघाचे स्वागत करण्यासाठी मुंबईसह विविध भागांतून असंख्य क्रिकेटप्रेमी उपस्थित होते, तर बीसीसीआयचे अध्यक्ष रॉजर बिन्नी, सचिव जय शाह, खजिनदार आशिष शेलार आदी मान्यवरही हजर होते.

विजयी मिरवणुकीनंतर बीसीसीआयकडून तब्बल १२५ कोटी रुपयांचे बक्षीस देऊन विजेत्या संघाला गौरविण्यात आले. विशेष म्हणजे या सोहळ्यासाठी मुंबई क्रिकेट असोसिएशनने सर्व चाहत्यांना वानखेडे स्टेडियममध्ये मोफत प्रवेश देण्याचा निर्णय घेतला होता. या वेळी चॅम्पियन संघाची झलक पाहण्यासाठी चाहत्यांनी क्रिकेटच्या पंढरीत मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.

## पंतप्रधान मोदींकडून खेळाडू, प्रशिक्षकांचे कौतुक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेचे जेतेपद जिंकून भारतात आगमन झालेल्या भारतीय संघाने सर्वप्रथम नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. भारतीय संघाचे खेळाडू तब्बल दीड तास पंतप्रधान मोदींच्या निवासस्थानी होते. या वेळी पंतप्रधानांनी सर्व खेळाडूंशी गप्पा मारल्या.

भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा याने वर्ल्डकपच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेवर थरारक विजय मिळवल्यानंतर



बार्बाडोसच्या मैदानावरची माती तोंडात टाकली होती. पंतप्रधान मोदींनी रोहितला मातीची चव कशी होती हा प्रश्न विचारला.

भारताची रनमशीन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विराट कोहलीला पंतप्रधान मोदींनी विचारले की, या स्पर्धेत तुझ्या फार धावा होत नव्हत्या. मग अंतिम सामन्यापूर्वी तुझ्या डोक्यात काय विचार सुरू होते?, तर विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात शेवटच्या षटकात भारताच्या सूर्यकुमार यादवने सीमारेषेवर दक्षिण आफ्रिकेच्या डेव्हिड मिलरचा अफलातून झेल पकडला होता. तेव्हा तुझा काय अनुभव होता, असे पंतप्रधान मोदींनी सूर्यकुमारला विचारले. या वेळी पंतप्रधानांनी इतर खेळाडूंशीही गप्पा मारल्या आणि प्रशिक्षक राहुल द्रविडसह सर्वांचे अभिनंदन व कौतुक केले.

## निवडक

### पंतप्रधान मोदी जाणार रशियाच्या दौऱ्यावर

**नवी दिल्ली** : नरेंद्र मोदींनी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर जी७ परिषदेला भेट दिली होती. आता ते ८ व ९ जुलै रोजी रशियाला भेट देणार असून राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्याशी संवाद साधणार आहेत. युक्रेन आणि रशियादरम्यान युद्ध सुरू झाल्यापासून पंतप्रधान मोदींचा हा पहिलाच दौरा आहे. या दौऱ्यात मोदी आणि पुतिन द्विपक्षीय संबंध आणखी बळकट करणे आणि विविध आंतरराष्ट्रीय विषयांवर चर्चा करतील.

### ज्येष्ठ अभिनेत्री स्मृती विश्वास यांचे निधन

**नाशिक** : ज्येष्ठ अभिनेत्री स्मृती विश्वास नारंग यांचे निधन झाले आहे. त्यांनी अभिनेते राज कपूर आणि देवानंद यांच्यासारख्या दिग्गज कलाकारांसोबत काम केले आहे. स्मृती यांनी वयाच्या १००व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. नाशिकमध्ये राहत्या घरी बुधवारी रात्री त्यांची प्राणज्योत मालवली. फिल्म हेरिटेज फाऊंडेशनने या अभिनेत्रीचा फोटो सोशल मीडियावर शेअर करून ही बातमी दिली.

## ऑगस्ट महिन्यात ग्रामपंचायत निवडणुकांची शक्यता

### मतदार याद्या तयार करण्याचे आयोगाचे निर्देश



**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायत निवडणुका घेण्याची तयारी सुरू केली आहे. या निवडणुका ऑगस्ट महिन्यात होण्याची शक्यता आहे. मुदत संपलेल्या रायगड जिल्ह्यातील २४० ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. त्या दृष्टीने मुदत संपलेल्या आणि आगामी काळात मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या अंतिम मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे.

राज्यातील जानेवारी ते डिसेंबर २०२४ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नवीन निर्मिती झालेल्या आणि चुकीची प्रभाग रचना व इतर कारणांमुळे निवडणुका होऊ न शकलेल्या एक हजार ५८८ ग्रामपंचायतींच्या प्रभागनिहाय मतदार याद्या तयार करण्याचे निर्देश राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत. निवडणूक आयोगाने काढलेल्या आदेशानुसार ९ जुलै रोजी प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जातील. ९ ते १५ जुलैपर्यंत यावर हरकती व सूचना दाखल करता येतील. १९ जुलैला प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. यात रायगड जिल्ह्यातील २४० ग्रामपंचायतींचा समावेश आहे. जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींच्या मुदती संपून बरेच महिने उलटले आहेत. त्यांचा कारभार सध्या प्रशासक पाहत आहेत. लोकसभा निवडणुकीमुळे या ग्रामपंचायतींच्या निवडणुका घेणे शक्य झाले नाही, मात्र आता विधानसभेपूर्वी या निवडणुका आटोपण्याचा निवडणूक आयोग व प्रशासनाचा विचार आहे. त्या दृष्टीने तयारी सुरू असून मतदार याद्या अंतिम करणे हे त्यासाठीचे पहिले पाऊल मानले जात आहे. **(पान २ वर..)**


## रायगड जिल्हा रुग्णालयाच्या नव्या इमारत उभारणीस शासनाची मंजुरी

### ३०० बेडची सात मजली वास्तू साकारणार

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या नव्या ३०० बेडच्या सात मजली इमारत उभारणीस राज्य शासनाची मंजुरी मिळाली आहे. या बांधकामासाठी १५० कोटी ६८ लाख निधी अपेक्षित असून याबाबत एक-दोन दिवसात शासन निर्णय जाहीर होणे अपेक्षित आहे. आमदार महेंद्र दळवी यांनी यासाठी पाठपुरावा केला होता.

जिल्हा रुग्णालयाची आंतररुग्ण इमारत जीर्ण झाल्याने ती पाडून नवी इमारत बांधावी अशी मागणी गेली अनेक वर्षे होत होती. गतवर्षी रूजू झालेले जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांनी रुग्णालय नव्याने बांधण्याबाबत प्रयत्न सुरू केले होते. सार्वजनिक बांधकाम विभागही याबाबत



सकारात्मक होता. आमदार महेंद्र दळवी यांनी यासाठी पाठपुरावा केला. त्यानुसार या संदर्भात मंत्रालयात राज्याच्या मुख्य सचिवांच्या उपस्थितीत बुधवारी (दि. ३) हाय पॉवर कमिटी बैठक झाली. या बैठकीत अलिबाग येथे ३०० बेड रुग्णालयाच्या इमारत बांधकामाला मंजुरी देण्यात आली.

> ***रायगड जिल्हा रुग्णालयाला नवी इमारत मिळावी यासाठी शासनाला पत्र दिले होते. त्यानुसार बुधवारी हाय पॉवर कमिटी बैठकीत नव्या इमारत बांधकामाला मंजुरी देण्यात आली आहे. ३०० बेडचे अद्ययावत असे सात मजली रुग्णालय उभारले जाणार आहे. यासाठी दीडशे कोटी रुपये इमारत खर्च होणार आहे. याबाबत एक, दोन दिवसांत शासन आदेश (जीआर) निघणार आहे. त्यामुळे गोरगरीब जनतेला योग्य आरोग्य सुविधा मिळेल.***
>
> **-महेंद्र दळवी, स्थानिक आमदार**

### अशी असेल रचना

जिल्हा रुग्णालय परिसरात दोन लाख चौरस फूट बांधकाम करून ३०० बेडचे अद्ययावत रुग्णालय उभारले जाणार आहे. यासाठी दीडशे कोटी खर्च होणार आहे. ही सात मजली इमारत असेल. केंद्राच्या नियमानुसार पब्लिक हेल्थ सेंटरच्या मान्यतेनुसार बांधकाम केले जाणार आहे. ३०० बेडसह २० बेडचा वेगळा आयसीयू कक्ष असणार आहे तसेच १६ बेडचा नवजात बालकक्ष, २० बेडचे डायलिसिस सेंटर, रुग्णथांबा कक्ष, अपघात विभाग तसेच अपघात विभागात वेगळे शस्त्रक्रिया कक्षही उभारले जाणार आहे. याशिवाय लॉंड्री, पाककक्ष, क्ष किरण कक्ष, चार लिफ्ट, दोन जिने, एक रॅम्प अशी सुविधा इमारतीमध्ये असतील. त्यामुळे नागरिकांना सुसज्ज असे जिल्हा रुग्णालय आणि उत्तम आरोग्य सुविधा मिळणार आहे.



## एमएनएम विद्यालयातील विद्यार्थ्यांचे 'शिष्यवृत्ती'त यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या पनवेल तालुक्यातील गव्हाण कोपर येथील मोरू नारायण म्हात्रे (एमएनएम) विद्यालयातील विद्यार्थ्यांनी पूर्व उच्च प्राथमिक आणि माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तम यश संपादन केले आहे. या सर्व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिनंदन

खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गुरुवारी (दि. ४) अभिनंदन केले.

पूर्व उच्च प्राथमिक विभागात पाचवीच्या आरव पंढरीनाथ भिलारे, अंश संजय कडू, वेदक नरेंद्र ठाकूर या तीन विद्यार्थ्यांना, तर माध्यमिक विभागात आठवीच्या श्रीपाद लक्ष्मण भगत, अन्वी गगन कोळी, अंतरा किरण पाटील, वेदांश प्रवीण पाटील या चार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली आहे. या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना विद्यालयात विशेष मार्गदर्शन करण्यात आले होते तसेच वेळोवळी सराव परीक्षा घेतल्या गेल्याचे या वेळी प्रभारी मुख्याध्यापिका प्रणिता गोळे यांनी सांगितले.

## आजपासून सहा दिवस जोरदार पावसाचा अंदाज



**पुणे : प्रतिनिधी**

सध्या मान्सूनने देश व्यापला असला तरी कुठे कमी, तर कुठे जास्त प्रमाणात पाऊस हजेरी लावत असल्याचे चित्र पहायला मिळत आहे. महाराष्ट्रातदेखील अशीच स्थिती आहे. दरम्यान, ज्येष्ठ हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार ५ ते १० जुलैपर्यंत राज्याच्या विविध भागात जोरदार पाऊस कोसळणार आहे.

हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी सांगितले की, महाराष्ट्रात मराठवाडा वगळता शुक्रवार (दि. ५)पासून पुढील सहा दिवस म्हणजे १० जुलैपर्यंत एमजेओ व मान्सूनच्या तसेच तटीय अशा दोन्हीही आसामुळे मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता आहे. कोकणातून सह्याद्रीच्या वर सरकलेल्या मान्सूनची घाटमाथ्यावर सक्रियता वाढली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील धरणक्षेत्रात आवक वाढून जल साठवण टक्केवारीच्या मापनास सुरुवात होऊ शकते, अशीही माहिती खुळे यांनी दिली.




# वीज कंपनीतील कंत्राटी कामगारांच्या हिताचे निर्णय घेणार -फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**



राज्यातील महानिर्मिती, महापारेषण आणि महावितरण कंपन्यांमध्ये कार्यरत कंत्राटी कामगारांच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक असून कामगारांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी शासन सकारात्मक असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत सांगितले.

सदस्य श्रीकांत भारतीय यांनी तीनही वीज कंपन्यांमध्ये कार्यरत कंत्राटी कामगारांच्या समस्यांबाबत प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री सतेज पाटील, भाई जगताप यांनी सहभाग घेतला.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वीज उद्योगातील कंत्राटी कामगारांसंदर्भातील मागण्यांबाबत ८ जानेवारी आणि ९ मार्च रोजी बैठका घेण्यात आल्या होत्या. यात वस्तूस्थिती अवगत करण्यात आली. राज्यात हरियाणा कंत्राटी कामगारांच्या बाबतीच्या धोरणासंदर्भात चर्चा होऊन त्या धोरणामध्ये कंत्राटी कामगारांना कुठेही कायम करण्याची शाश्वती देण्यात आलेली नाही व हरियाणा सरकारने लागू केलेले कायदे राज्यात अगोदरच लागू असल्याचेही अवगत करण्यात आले.

कंत्राटी कामगारांच्या हितासाठी असलेल्या निर्णयांबाबत माहिती देताना उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महावितरण व महापारेषण कंपनीमध्ये काम करीत असलेल्या कंत्राटी कामगारांना नियमित सेवेतील प्रवेशाचा मार्ग सुकर करण्याकरिता त्यांच्या मागील अनुभवाच्या आधारे त्यांना सरळसेवा भरतीमध्ये प्रती वर्षे दोन गुण असे पाच वर्षांच्या अनुभवासाठी जास्तीत जास्त १० गुण देण्यात येतात. याशिवाय महावितरण कंपनीने विहीत शैक्षणिक अर्हता नसलेल्या कंत्राटी कामगारांना विद्युत सहायक व उपकेंद्र सहाय्यक या पदाकरिता आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता प्राप्त करण्याकरिता तीन वर्षांचा अवधी दिला आहे. त्याचप्रमाणे महापारेषण कंपनीमध्ये कोणत्याही कंत्राटी कामगारास विहित शैक्षणिक अर्हता प्राप्त नसल्यामुळे कमी करण्यात आल्याची बाब निदर्शनास येत नसल्याचे सांगितले. याशिवाय भरती प्रक्रियेमध्ये कंत्राटी कामगारांना जास्तीत जास्त प्रमाणात सामावून घेण्यासाठी मुख्य सचिवांसमवेत बैठकीमध्ये चर्चा करून मार्ग काढण्यात येत असल्याचे ते म्हणाले. कामगारांना कमीत कमी वेतन देताना त्यांना ६२ टक्के विविध भत्ते देण्यात येत असल्याचे सांगून वीज उद्योगाकरिता किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत स्वतंत्र अनुसूची उद्योग म्हणून किमान वेतन निश्चित करण्याबाबत चार महिन्यांत निर्णय घेऊ, असेही त्यांनी सांगितले.

### सौर कृषी पंपांकरिता शेतकऱ्यांवरील भार वाढवलेला नाही!

*प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा एवम् उत्थान महाअभियान (पीएम कुसुम)ची राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत सर्वसाधारण शेतकरी लाभार्थी हिस्सा १० टक्के, तर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती शेतकरी लाभार्थी हिस्सा पाच टक्के असून यामध्ये कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत स्पष्ट केले.*

# आरोपीला जामीन देण्यासाठी बनावट कागदपत्रांचा वापर

## पनवेल सत्र न्यायालयातील प्रकार

**पनवेल : वार्ताहर**

अॅट्रोसिटीच्या गुन्ह्यातील आरोपीला जामीन देण्यासाठी एका व्यक्तीने पनवेल येथील अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायलयात बनावट कागदपत्र सादर केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

आनंद रमेश यादव (२७) असे या व्यक्तीचे नाव असून पनवेल शहर पोलिसांनी त्याच्या विरोधात फसवणुकीसह बनावट कागदपत्रे तयार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

पनवेल तालुका पोलीस पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या अॅट्रॉसिटी अॅक्टच्या गुन्ह्यात आरोपी गौरव तिवारी याला पोलिसांनी अटक केली होती. आरोपी गौरव तिवारी याला पनवेल येथील अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केल्यानंतर त्याने जामीनदार म्हणून आनंद रमेश यादव या बोगस व्यक्तीला न्यायालयात उभे केले होते. आनंद यादव याने कल्याण म्हारळगांव येथील गणेश नगरमधील पत्ता असलेल्या रेशनकार्डची छायांकीत प्रत आणि म्हारळगाव ग्रामपंचायतीकडील २०२३-२४ या आर्थिक वर्षाचा अॅसेसमेंट दाखला सादर केला होता.

न्यायाधिशांना जामीनदार आनंद यादव याच्या कागदपत्रांबाबत संशय आल्याने त्यांनी सदर कागपत्रांची पडताळणी करुन त्याबाबतचा अहवाल न्यायालयात सादर करण्याचे आदेश पोलिसांना दिले होते. त्यानंतर आनंद यादव याने न्यायालयात सादर केलेल्या कागदपत्राची पोलिसांनी पडताळणी केली असता, त्याने सादर केलेले रेशनकार्ड आणि म्हारळगावचा असेसमेंटचा उतारा बनावट असल्याचे आढळून आले.

त्यानंतर आनंद यादव याने न्यायालयात बनावट कागदपत्र सादर करून न्यायालयाची फसवणूक केल्याचे आढळून आले. त्यामुळे न्यायाधिशांनी बोगस जामीनदार आनंद यादव याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार पोलिसांनी आनंद यादव याच्याविरोधात फसवणुकीसह बनावट कागदपत्रे तयार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

# सरखेल कान्होजी आंग्रे यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

## नौदल आणि रायगड पोलिसांची मानवंदना

**अलिबाग : प्रतिनिधी**



हिंदवी स्वराज्याचे आरमार प्रमुख सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या पुण्यतिथीनिमित्त गुरुवारी (दि.४) अलिबाग येथे अभिवादन करण्यात आले. गाज फाउंडेशन आणि अलिबाग नगर परिषदेने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. भारतीय नौदलाचे कमांडिंग ऑफिसर कमोडोर ऋषीराज कोहली यांनी कान्होजी आंग्रे यांच्या समाधीवर पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले.

रायगड पोलीस दलातर्फे देखील कान्होजी आंग्रे यांना मानवंदना देण्यात आली. या वेळी कान्होजी आंग्रे यांचे वंशज रघुजीराजे आंग्रे, जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अलिबाग नगरपालिकेच्या मुख्याधिकारी अंगाई साळुंखे, माजी उपनगराध्यक्षा अॅड. मानसी म्हात्रे, माजी नगरसेवक विजय झुंजारराव, अनिल चोपडा, संजना कीर यांच्यासह डॉ. निशिगंध आठवले यांनीही सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या समाधीसमोर नतमस्तक होत अभिवादन केले. या वेळी नगरपालिकेचे कर्मचारी, शालेय विद्यार्थी उपस्थित होते.

कमोडोर ऋषीराज कोहली यांनी आंग्रे समाधी परिसराची माहिती करून घेतली. समाधीस्थळ परिसराच्या सुशोभिकरणावर यावेळी चर्चा झाली. यानिमित्ताने घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषिक वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात विविध सांस्कृतिक स्पर्धा



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात सांस्कृतिक समितीच्या वतीने गुरुवारी (दि.४) टॅलेंट हंट अंतर्गत विविध सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन केले होते. या स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वेगवेगळे सामाजिक, पर्यावरणीय व सांस्कृतिक उपक्रम घेत असते. त्याचाच एक भाग म्हणून टॅलेंट हंट अंतर्गत नाटक, गायन व नृत्य अशा वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन केले होते.

या स्पर्धांमध्ये महाविद्यालयातील वेगवेगळ्या विभागातील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला. या स्पर्धांसाठी परीक्षक म्हणून प्रा. नीलम मोरे यांनी काम पाहिले, तसेच स्पर्धांचा निकाल ही जाहीर करण्यात आला गायन स्पर्धेमध्ये धनुष याने प्रथम क्रमांक पटकाविला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी त्याचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. या स्पर्धांचे आयोजन प्रा. डॉ. दीपिका हसीजा समन्वयक सांस्कृतिक समिती, यांनी केले तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. भक्ती जोशी, प्रा. तनुजा सुमन, प्रा. राहुल कांबळे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

पान १ वरुन

## ऑगस्ट महिन्यात ग्रामपंचायत निवडणुकांची शक्यता

विधानसभा निवडणूकांपूर्वी ग्रामपंचायत निवडणूका घेण्याचा निवडणूक आयोगाचा विचार सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात गणेशोत्सव सुरू होत आहे. त्यानंतर लगेचच विधानसभा निवडणुकांची आचारसंहिता जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या ऑगस्ट महिन्यात या ग्रामपंचायत निवडणुका आटोपण्याच्या दृष्टीने तयारी सुरू झाली आहे.

ग्रामपंचायतींची तालुकावार यादी

अलिबाग (३४) : चेंढरे, वरसोली, थळ, मापगाव, सातिर्जे, आगरसुरे, झिराड, धोकवडे, सारळ, डावली-रांजणखार, रेवस, परहूर, चरी, कुरकुंडी-कोलटेंभी, शहापूर, आंबेपूर, पोयनाड, श्रीगाव, कुसुंबळे, कुर्डुस, ताडवागळे, कुरूळ, बेलकडे, ढवर, कावीर, बामणगाव, सहाण, बेलोशी, चिंचोटी,बोरघर, रामराज, सुडकोली, वरंडे, चौल.

महाड (३०) : आंबेशिवथर, दाभेळ, जिते, कसबेशिवथर, कुंभेशिवथर, खर्डी, पांगारी, रेवतळे, सव, शिंगरकोंड, आंमशेत, वाकी बु., आंबिवली, आकले, भावे, दहिवाड, कांबळे तर्फे महाड, किंजळोली बु., कुंभार्डे, निजामपूर, पाने, सांदोशी, सोनघर, तेटघर, वाळण बु., विन्हेरे, वलंग, वरंडोली, वसाप, चोचिंदे.

कर्जत (३०) : आसल, माणगाव तर्फे वरेडी, शेलू, पिंपळोली, मानिवली, पाषाणे, वारे, बीड बु., सावळा-हेदवली, मोग्रज, बोरीवली, अंजप, चिंचवली, भालिवडी, पळसदरी, हालिवली, ममदापूर, सावेळे, खांडपे, किरवली, पाथरज, शिरसे, रजपे, जामरूंग, उमरोली, नेरळ, वाकस, तिवरे, वरई,

रोहा (२६) : आंबेवाडी, ऐनवहाळ, कडसुरे, किल्ला, कुडली, कोलाड, चिंचवली तर्फे अतोणे, जामगाव, देवकान्हे, धाटाव, धोंडखार, नेहरूनगर, पाटणसई, पिगोंडे, पिंगळसई, पुगाव, भालगाव, भिसे, मढाली खुर्द, मेढा, वणी, वरसगाव, वाली, वांगणी, सारसोली, संभे.

माणगाव (२१) : पोटनेर, वावेदिवाळी, विळे, वरची वाडी, पाणसई, कोस्ते खुर्द, दाखणे, मढेगाव, तळेगाव तर्फे गोरेगाव, सुरव, निळज, तळाशेत, पाटणूस, रवाळजे, साजे, सणसवाडी, साळवे, निजामपूर, पेण तर्फे तळे, साले, फलाणी.

तळा (१८) : रोवळा, वरळ, पन्हेळी, सोनसडे, काकडशेत, पिटसई, मालुक, वानस्ते, महागाव, पढवण, मेढे, बोरघर हवेली, मजगाव, शेणवली, वाशी हवेली, फळशेत-कर्नाळा, उसर खुर्द, वांजळोशी

पेण (१८) : गागोदे (बु.), करंबेळी, कासू, अंतोरे, जावळी, पाबळ, वरेडी, बेणसे, शिहू, कुहिरे, झोतीरपाडा, वढाव, शिर्की, उंबर्डे, कांदळे, रावे, शेडाशी, जिर्णे,

श्रीवर्धन (१६) : निगडी, वडघर, खुजारे, कार्ले, आराठी, काळींजे, दांडा, शिस्ते, गौळवाडी, नागलोली, हरेश्वर, भोस्ते, वडवली, बोर्लीपंचतन, वेळास, मारळ.

पनवेल (१५) : गव्हाण, नांदगाव, पोयंजे, वांगणी तर्फे वाजे, आदई, वावंजे, शिरवली, कुंडेवहाळ, चिपळे, कर्नाळा, कराडे खुर्द, चावणे, जांभिवली, पारगाव, पळस्पे.

म्हसळा (११) : मेंदडी, आंबेत, खारगाव खुर्द, कोळे, मांदाटणे, रोहिणी, खारगाव बु., खामगाव, गोंडघर, तुरुंबाडी, चिखलप.

उरण (७) : बांधपाडा, आवरे, गोवठणे, विंधणे, हनुमान कोळीवाडा, सोनारी, कोप्रोली, मोठी जुई.

सुधागड (६) : कुंभारशेत, नागशेत, नेणवली, उद्धर, वाघोशी, चिखलगाव.

मुरूड (४) : उसरोली, मजगाव, आंबोली, सावली.

खालापूर (३) : वडगाव, कलोते, नावंडे.

# आयुक्तांच्या अचानक भेटीने शिक्षकांची उडाली तारांबळ

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे आरोग्य आणि शिक्षण या विषयांना सर्वाधिक प्राधान्य राहिले आहे. या अनुषंगाने आयुक्तांनी गुरुवारी (दि.४) सेक्टर १६ वाशी येथील नमुंमपा शाळा क्रमांक २८मध्ये अचानक भेट देत तेथील कामकाजाची व सेवांची पाहणी केली. शाळा व्यवस्थापनामध्ये सुधारणा करण्याचे निर्देश दिले.

शाळेतील अंतर्गत स्वच्छतेवर नाराजी व्यक्त करीत शाळेपासूनच विद्यार्थ्यांवर स्वच्छतेचे संस्कार होत असल्याने शाळेची अंतर्गत स्वच्छता व परिसर स्वच्छ असणे ही शिक्षकांची जबाबदारी असल्याचे सांगत यामध्ये त्वरित सुधारणा करण्याचे निर्देश देण्यात आले. काही वर्गांमध्ये तसेच गच्चीवर टाकाऊ सामान तसेच बेंचेस कसेही टाकून ठेवण्याचे निदर्शनास आले. त्यांची विल्हेवाट लावून अथवा योग्य प्रकारे व्यवस्थित ठेवून नीटनेटकेपणा राहील याकडे कटाक्षाने लक्ष देण्याचे आयुक्तांनी निर्देशित केले.





वाशीतील नमुंमपा शाळेची केली पाहणी

आयुक्तांनी भेट दिलेली सकाळची वेळ विद्यार्थ्यांच्या मध्यान्ह भोजनाची असल्याने मुलांना देण्यात येणारे अन्न आयुक्तांनी स्वत: खाऊन पाहिले व अन्नाच्या दर्जात अधिक सुधारणा करण्याचे आणि त्याकडे दैनंदिन लक्ष ठेवण्याचे निर्देश मुख्याध्यापकांना दिले. अन्न तपासणाऱ्या शिक्षकाच्या नावासह अन्नाच्या दर्जाबाबतची नोंद आहार पुरवठा नोंदवहीत दररोज न चुकता करावी असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना पुरेशा प्रमाणात अन्न उपलब्ध होईल याची काळजी घ्यावी आणि त्यांना ते खाण्यासाठी स्वच्छ व योग्य जागा उपलब्ध करून द्यावी अशाप्रकारे नियोजन करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. विद्यार्थ्यांना भोजनासाठी ताटे पुरविण्यात यावीत व तीदेखील स्वच्छ असतील याची दक्षता घेतली जावी असे निर्देशित करण्यात आले. भोजन झाल्यानंतर उरलेले अन्नपुरवठादाराने त्याच दिवशी परत घेऊन जाणे गरजेचे असून अन्न वितरणाची जबाबदारी असणाऱ्या शिक्षकांनी याची विशेष दक्षता घ्यावी, अशाही सूचना देण्यात आल्या.

शाळेतील स्वच्छतागृहांचे सुधारणा काम सुरू असल्याचे आयुक्तांच्या निदर्शनास आले. काम सुरू असले तरी स्वच्छतागृहांच्या ठिकाणी आवश्यक स्वच्छता असलीच पाहीजे असे कटाक्षाने सांगत शौचालयांच्या नियमित स्वच्छतेमधून विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेतली जावी असे आयुक्तांनी स्पष्ट केले. शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या हजेरीपटाचीही आयुक्त महोदयांनी बारकाईने पाहणी केली. या शाळा इमारतीत तळमजल्यावर समावेशित शिक्षण दिले जात असून त्याठिकाणी दिव्यांग विद्यार्थ्यांना विशेष शिक्षण दिले जात आहे. त्याची माहिती घेत आयुक्तांनी यामध्ये अधिक गुणवत्तापूर्ण काम होण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेच्या इटीसी केंद्राचे मार्गदर्शन घ्यावे, असे सूचित केले.

## राज्यात सात ठिकाणी होणार एमआयडीसीची प्रादेशिक कार्यालये

**मुंबई** : नंदुरबार जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रात नव्याने उद्योग येत आहेत. वस्त्रोद्योग क्षेत्राच्या अनुषंगाने काही उद्योग नव्याने येत असल्याची माहिती, उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत दिली. राज्यातील बारामती, अहमदनगर, अकोला, चंद्रपूर, सांगली, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची प्रादेशिक कार्यालये सुरू करण्यात येणार असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले. सदस्य राजेश पाडवी यांनी यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती. मंत्री सामंत म्हणाले की, नंदुरबार जिल्ह्यातील अतिरिक्त औद्योगिक क्षेत्रात विविध सुविधा उपलब्ध करून देत आहेत. नवापूर औद्योगिक क्षेत्रात नवे उद्योग येत आहेत. येत्या काळात या औद्योगिक क्षेत्रात गुंतवणूक वाढेल, अशी माहितीही त्यांनी दिली.

## दुखवटा

### वेदिका डाके



**धाटाव:** रोहा तालुक्यातील रोठ बुद्रुक ग्रामपंचायत उपसरपंच तथा भाजपच्या महिला कार्यकर्त्या वेदिका डाके यांचे निधन बुधवारी (दि. ३) दवाखान्यात झाले. त्या ३३ वर्षांच्या होत्या.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या समर्थक म्हणून त्यांची ओळख होती. रोठ बुद्रुक गावासह ग्रामपंचायत हद्दीतील गावात सामाजिक क्षेत्रात काम केल्याने त्यांना मानणारा मोठा वर्ग होता. त्यांच्या निधनाची माहिती मिळताच सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, आमदार प्रशांत ठाकूर, संघटकमंत्री सतिश धारप, आमदार रविशेठ पाटील, भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील, अॅड. महेश मोहिते यांनी शोक व्यक्त केला.

## निवडक

### सुधागड विद्यासंकुलचे 'शिष्यवृत्ती'त यश



**कळंबोली** : महाराष्ट्र शासनाच्या राज्य परीक्षा परिषदतर्फे फेब्रुवारीमध्ये घेण्यात आलेल्या पाचवी व आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत सुएसोच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कळंबोली येथील इयत्ता पाचवीतील विद्यार्थिनी वेदिका सुभेदार हिने रायगड जिल्हा शहरी सर्वसाधारण गुणवत्ता यादीत ११वा क्रमांक प्राप्त केला, तसेच आठवीतून प्रणाली सचिन जगदाळे हिने रायगड जिल्हा शहरी सर्वसाधारण गुणवत्ता यादीत ५४वा क्रमांक प्राप्त करून यश संपादन केले आहे. यशस्वी विद्यार्थिनींचे प्राचार्य राजेंद्र पालवे, उपमुख्याध्यापक सुरेश शिंदे, पर्यवेक्षक अनिता पाटील, बाबूराव शिंदे, पुनम कांबळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

### तरुणाच्या मृत्यूप्रकरणी ठेकेदारावर गुन्हा

**पनवेल** : मागील महिन्यात तळोजा फेज २ येथील घोटगावाजवळ अरिहंत अनंत कन्स्ट्रक्शन कंपनीचे काम सुरू असताना ३६ वर्षीय तरुणाचा इमारतीवरून पडून मृत्यू झाला होता. या घटनेबाबत तळोजा पोलिसांनी संबंधित इमारतीचे बांधकाम करणाऱ्या ठेकेदाराविरोधात सुरक्षेबाबत निष्काळजी केल्यामुळे गुन्हा नोंदविला आहे. प्रवीण शिंदे यांचा या अपघातामध्ये १६ जूनला मृत्यू झाला होता. त्यांच्या पत्नी स्मिता यांनी दिलेल्या तक्रारीवरून ठेकेदार पंकज पटोलिया याच्या दुर्लक्षितपणामुळे प्रवीण यांचा मृत्यू झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे. तळोजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश काळदाते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संजय अहिरे हे या प्रकरणाचा तपास करीत आहेत.

# प्रत्येक आगारात साजरा होणार प्रवासी राजा दिन

## एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांची माहिती

**पनवेल : प्रतिनिधी**

प्रवाशांच्या समस्या, तक्रारीवजा सूचना यांचे स्थानिक पातळीवर जलद गतीने निराकरण होण्याच्या उद्देशाने प्रत्येक आगारात (डेपो) दर सोमवारी व शुक्रवारी प्रवासी राजा दिन आयोजित करण्यात येणार आहे. या दिवशी एसटीचे जिल्हा प्रमुख म्हणजे विभाग नियंत्रक एका आगारात जाऊन प्रवाशांच्या समस्या, तक्रारी, सूचना ऐकून घेतील. त्या तातडीने सोडविण्याच्या दृष्टीने उपाययोजना करतील. त्यामुळे प्रवाशांचे समाधान होऊन प्रवासी सेवेचा दर्जा व गुणवत्ता वाढण्यास मदत होईल, असे एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी सांगितले आहे.



प्रवासी राजा दिन ही अभिनव योजना १५ जुलैपासून सुरू होणार आहे. प्रवासी, प्रवासी संघटना, शाळा-महाविद्यालयांनी आपल्या समस्या-तक्रारी, सूचना लेखी स्वरूपात दर सोमवारी व शुक्रवारी संबंधित आगारात सकाळी १० ते २ या वेळेत मांडू शकतात. त्यावर विभाग नियंत्रक तातडीने कार्यवाही करतील. प्रवासी राजा दिन कोणत्या दिवशी कोणत्या आगारात होणार आहे, याचे वेळापत्रक विभाग नियंत्रक त्या वेळी जाहीर करतील. विशेष म्हणजे प्रत्येक लेखी तक्रारीची नोंद ठेवण्यात येणार असून याबाबत काय कार्यवाही केली आहे, यावर मध्यवर्ती कार्यालय लक्ष ठेवणार आहे.

एसटीच्या विविध बसेसमधून दररोज सुमारे ५४ ते ५५ लाख प्रवाशांची सुरक्षित वाहतूक केली जाते. प्रवाशांना एसटी बसस्थानक, बसस्थानकांवरील प्रसाधनगृहे ही स्वच्छ, निर्जंतुक आणि टापटीप असावीत असे वाटते तसेच एसटी बसेस स्वच्छ व वेळापत्रकानुसार वेळेत मार्गस्थ व्हाव्यात, ठरलेले थांबे घ्यावेत, चालक-वाहकांनी त्यांच्याशी सौजन्याने वागावे, अशी किमान अपेक्षा प्रवाशांकडून व्यक्त केली जाते. यासंबंधी प्रवासी तक्रारींचे निराकरण वेळेत न झाल्याने प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागतो. या समस्यांचे निराकरण स्थानिक पातळीवर तातडीने होऊ शकते. प्रवासी सेवेचा दर्जा आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रवाशांच्या समस्यांचे वेळीच निराकरण होणे अत्यंत आवश्यक असते.

तसे झाल्यास प्रवाशांना समाधानकारक सेवा देणे एसटी महामंडळाला शक्य होणार आहे. प्रवाशांचे समाधान हा उद्देश ठेऊन येत्या १५ जुलैपासून प्रवासी राजा दिन या अभिनव योजनेचे आयोजन करण्यात येणार आहे. सर्व प्रवासी बंधू-भगिनींनी या योजनेचा लाभ घेऊन आपल्या समस्यांचे निराकरण करून घ्यावे, असे आवाहन एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी केले आहे.

## 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी शिबिरे घ्यावीत'

**उरण : प्रतिनिधी**

शासनाने जाहीर केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी लागणाऱ्या कागदपत्रांसाठी तहसिलदारांनी गावोगावी दाखले देणारी शिबिर भरविण्याची मागणी अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेने केली आहे. यासाठी या संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे.

या वेळी जनवादी महिला संघटनेच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष हेमलता पाटील, उषाताई म्हात्रे, छाया मढवी, निरा घरत, रजनी पाटील, पल्लवी भोईर, कुंदा पाटील, सिमा कांबळे आदी उपस्थित होत्या.

## पनवेलच्या वीर सावरकर चौकात झाड कोसळले


### मनपा कर्मचाऱ्यांनी तातडीने केले बाजूला

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील वीर सावरकर चौकामध्ये गुरुवारी (दि.४) सकाळी चारचाकी आणि एका दुचाकीवर झाड पडले. त्यानंतर पनवेल महापालिकेचे अग्निशमन दलाच्या जवानांनी आणि आरोग्य कर्मचारी यांनी वूडकटर मशीनच्या सहाय्याने पडलेले झाड कापून बाजूला केले व रस्ता वाहतुकीस खुला करून दिला.

या ठिकाणी आरोग्य निरीक्षक जयेश कांबळे, यंत्रचालक कल्पेश पालेकर, अग्निशामक दलाचे सागर वर्तक, आशुतोष खानावकर, विकास घरत, मुकादम सचिन मोहोकर आणि स्वच्छता कर्मचारी सहभागी होते.

आयुक्त मंगेश चितळे यांनी पावसाळ्यात आपतकालीन परिस्थितीमध्ये अग्निशमन दलास सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आल्या आहेत. त्याप्रमाणे महापालिका



कार्यक्षेत्रात कोठेही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास तात्काळ अग्निशमनचे पथक त्या ठिकाणी पोहचून मदत कार्य करीत आहे. पावसाळ्यात येणाऱ्या आपतकालीन कामासाठी महापालिकेच्या वतीने विशेष पथकाची निर्मिती केली आहे. नागरिकांनी पावसाळ्यात काही आपत्ती ओढवल्यास महापालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन कक्षास (०२२-२७४६१५००) किंवा टोल फ्री नंबर (१८००२२७७०१) या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

## 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांचे प्रज्ञाशोध परीक्षेत यश

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या बुद्धीची चमक दाखविली आहे. या परीक्षेस एकूण ८८ विद्यार्थी बसले होते. त्यातील एक विद्यार्थी राज्यस्तरीय गुणवत्ता प्राप्त, एक विद्यार्थी जिल्हास्तरीय गुणवत्ता प्राप्त, पाच विद्यार्थी तालुकास्तरीय गुणवत्ता प्राप्त, तीन विद्यार्थ्यांना विशेष गुणवत्ता तर एका विद्यार्थ्याला उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले आहे. ६४ विद्यार्थ्यांना गुणवत्ता प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले.



यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये श्रावणी थळे राज्यस्तरीय पारितोषिक, पूजा नामे जिल्हास्तरीय पारितोषिक, ओंकार धर्माधिकारी विशेष पारितोषिक, प्रणव दाभाडे विशेष पारितोषिक, सोहम ठाकूर विशेष पारितोषिक, ईश्वरी खाडे तालुकास्तरीय पारितोषिक, रुत्विक पाटील, तालुकास्तरीय पारितोषिक, आदित्य पावले तालुकास्तरीय पारितोषिक, ओम वाघ तालुकास्तरीय पारितोषिक, किमया ताडे तालुकास्तरीय पारितोषिक, निधी म्हेतर उत्तेजनार्थ पारितोषिक यांचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांचे आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ. एस.टी. गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षक, शिक्षकांकडून अभिनंदन करण्यात आले.



कळंबोली : येथील सर्कलजवळ वाहतूक पोलीस शाखेचे वरिष्ठ निरीक्षक हरिभाऊ बानकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक शिर्के, उपनिरीक्षक साठे व कर्मचाऱ्यांनी नाका कामागारांची बैठक घेऊन रस्ता क्रॉस करताना झेब्रा क्रॉसिंगचा वापर कसा करावा याबाबत सूचना देऊन प्रबोधन केले तसेच अपघातग्रस्तातील जखमींना करावयाच्या मदतीबाबत समजावून सांगितले.





**पनवेल : रयत शिक्षण संस्थेचे महात्मा फुले महाविद्यालय आणि माजी विद्यार्थी मंडळाच्या वतीने व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन गुरुवारी करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष तथा माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, संजीवन म्हात्रे, रमाकांत म्हात्रे, उपप्राचार्य डॉ. राजाराम पाटील, डॉ. एन.बी. पवार, डॉ. आर.पी. म्हात्रे, प्रा. प्रवीण गायकर, प्रा. डॉ. प्रफुल्ल वशेणीकर आदी उपस्थित होते.**

# ज्येष्ठ नागरिकांनी मुख्यमंत्री वयोश्री योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मोठ्या प्रमाणात ज्येष्ठ नागरिकांना कोणत्या ना कोणत्या अपंगत्वाचा सामना करावा लागतो. ही बाब विचारात घेऊन केंद्र शासनाने द्रारिद्र्यरेषेखालील संबंधित दिव्यांग व दुर्बलग्रस्त ज्येष्ठ नागरिकांसाठी शारिरीक अक्षमतेनुसार सहाय्यक साधने, उपकरणे खरेदी करण्याकरिता तसेच मनस्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र आदीद्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्यासाठी मुख्यमंत्री वयोश्री योजना सुरू केली आहे. या योजनेचा जास्तीत जास्त ज्येष्ठ नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी केले आहे.

निकषाप्रमाणे लाभार्थ्यांना वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत तपासून पात्र लाभार्थ्यांची यादी जिल्हा समाजकल्याण विभागाकडे पाठवण्यात येणार आहेत. याकरिता घरोघरी जाऊन आशा स्वयंसेवकांमार्फत सर्वेक्षण करण्यात येणार आहे. लाभार्थ्यांच्या पात्रतेनुसार समाज कल्याण विभागमार्फत कमाल ३००० रु. इतके अनुदान प्राप्त होणार आहे.

**लाभार्थ्यांच्या पात्रतेचे निकष**

योजनेंतर्गत लाभार्थी व्यक्ती राज्यातील ज्येष्ठ नागरिक ज्यांचे वय ३१ डिसेंबर २०२३पर्यंत ६५ वर्षे पूर्ण झालेले असावे, लाभार्थी पात्रतेसाठी जिल्हा प्राधिकरणाकडून प्रमाणपत्र किंवा बीपीएल रेशन कार्ड किंवा राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रमांतर्गत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजनेंतर्गत किंवा राज्य/केंद्रशासित सरकारच्या इतर कोणत्याही पेन्शन योजनेंतर्गत वृद्धापकाळ निवृत्तीवेतन मिळाल्याचा पुरावा सादर करू शकतो, लाभार्थ्यांचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु. दोन लाखांच्या आत असावे, याबाबतचे लाभार्थ्याने स्वयंघोषणापत्र सादर करणे आवश्यक राहील,

**आवश्यक कागदपत्रे**

1. आधारकार्ड/मतदान कार्ड
2. राष्ट्रीयकृत बँकेची बँक पासबुक झेरॉक्स
3. पासपोर्ट आकाराचे २ फोटो
4. स्वयं-घोषणापत्र
5. शासनाने ओळखपत्र पटविण्यासाठी विहीत केलेली अन्य कागदपत्रे

सदर व्यक्तीने मागील तीन वर्षांत स्थानिक स्वराज्य संस्था आणि सरकारद्वारे नियंत्रित सार्वजनिक उपक्रमांसहित कोणत्याही सरकारी स्रोतांकडून तेच उपकरण विनामूल्य प्राप्त केले नसावे. याबाबतचे लाभार्थ्याने स्वयंघोषणापत्र सादर करणे आवश्यक राहील, मात्र दोषपूर्ण, अकार्यक्षम उपकरणे इत्यादींच्या बदलीला अपवाद म्हणून परवानगी दिली जाऊ शकते.

पात्र लाभार्थ्यांच्या बँकेच्या वैयक्तीक आधार संलग्न बचत खात्यात रु. ३००० थेट लाभ वितरण प्रणालीद्वारे वितरीत झाल्यावर सदर योजनेंतर्गत विहीत केलेली उपकरणे खरेदी केल्याचे तसेच मनःस्वास्थ केंद्राद्वारे प्रशिक्षण घेतल्याचे लाभार्थ्यांचे देयक (इनव्हाईस) प्रमाणपत्र ३० दिवसांच्या आत संबंधित सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांच्याकडून प्रमाणित करून संबंधित केंद्रीय सामाजिक उपक्रम (CPSU) संस्थेमार्फत विकसित पोर्टलवर ३० दिवसांच्या आत अपलोड करणे आवश्यक राहिल. अन्यथा लाभार्थ्यांकडून सदर रक्कम वसूल करण्यात येईल. निवड/निश्चित केलेल्या जिल्ह्यात, लाभार्थ्यांच्या संख्येपैकी ३० टक्के महिला असतील.



**उलवे नोड : रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात नो बॅग डेनिमित्त प्रदूषण या विषयावर घोषवाक्य तयार करणे, गो ग्रीन या विषयावर पोस्टर बनवणे आणि चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती तसेच सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या शिवाय गोष्टी, गाणे, कविता, कथाकथन यासारखे उपक्रम राबविण्यात आले.**

# श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून चिर्ले शाळेत वह्यावाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, कला, सांस्कृतिक, वैद्यकीय अशा विविध क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने चिर्ले येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत वह्यावाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास भाजप महिला मोर्चाच्या उरण तालुका सरचिटणीस वर्षा प्रेमकुमार घरत, भाजप उरण तालुका चिटणीस राजन घरत, विनोद मढवी, सुभाष घरत, आरती मढवी, हेमलता ठाकूर, ज्योत्स्ना माळी, संचित ठाकूर, शिक्षक दीपक पाटील हजर होते.



वर्षा घरत यांनी आपले विचार मांडताना सांगितले की, गेले तीन दशकांपासून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने गोरगरीब व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले जाते, तर उच्च शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांना मंडळाकडून आर्थिक मदत केली जाते. आपण या समाजात काम करत असताना आपल्या कमाईमधून काही तरी भाग आपण समाजोपयोगी कार्यासाठी लावला पाहिजे. या शाळेतील विद्यार्थी अभ्यासाप्रमाणे क्रीडा क्षेत्रातसुद्धा तालुकास्तरावर नाव कमावतात याचा मला अभिमान आहे. भविष्यात विद्यार्थ्यांना काहीही शिक्षणासंदर्भात मदत लागल्यास आमच्या परीने जी मदत करणे शक्य होईल, ती मदत करण्याचा निश्चित प्रयत्न केला जाईल, असेही त्यांनी आश्वासित केले.

## संपादकीय

# खोटारडेपणाला लगाम हवा

अग्निवीर शहिदांच्या कुटुंबियांना सरकारकडून कोणताही लाभ दिला जात नसल्याचा आरोप लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला होता. त्यावर आता लष्कराकडून उत्तर देण्यात आले असून शहीद अग्निवीर अजय कुमार याच्या कुटुंबियांना आतापर्यंत ९८ लाख रुपयांचा मोबदला दिला असल्याचे लष्कराच्या वतीने सांगण्यात आले आहे.

**एखाद्या विषयासंदर्भात निवडणूक प्रचारादरम्यान केले जाणारे दावे वा आरोप वेगळे आणि लोकसभेत त्या संदर्भात तीच भाषा वापरणे वेगळे. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकांच्या प्रचारादरम्यान काँग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी अग्निवीर योजनेसंदर्भात अनेक उलटसुलट दावे केले होते, पण लोकसभेत विरोधी पक्षनेतेपदाची जबाबदारी हाती आल्यानंतरही राहुल गांधी यांनी हा विषय त्याच पद्धतीने लावून धरल्यामुळे आता त्याला गंभीर वळण लागण्याची चिन्हे आहेत. लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर बोलताना विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी, अग्निवीर योजना आणून मोदी सरकारने लष्करालाही धोक्यात आणले असा आरोप केला. केंद्र सरकार अग्निवीरांना वापरून फेकून देण्याचे काम करीत आहे, अशी टीकाही त्यांनी केली. अग्निवीर शहिदांच्या कुटुंबियांना सरकारकडून कोणतेही लाभ दिले जात नसल्याचा आरोपही केला. त्यावर संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी लागलीचच राहुल गांधी यांचा हा दावा खोटा असल्याचे म्हटले, पण त्याउप्परही लोकसभेतील भाषणानंतर राहुल गांधी यांनी आपल्या एक्स (आधीचे ट्विटर) अकाऊंटवरही या संदर्भात एक व्हिडीओ पोस्ट केला. या व्हिडीओत त्यांनी शहीद अजय कुमार सिंह यांच्या कुटुंबियांशी बातचीत केल्याचे दर्शविण्यात आले होते. या भेटीचा दाखला देत त्यांनी अग्निवीर शहिदांच्या कुटुंबियांना सरकारकडून कुठलाही लाभ दिला जात नसल्याचा दावा केला होता. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी या संदर्भात बोलताना भगवान शिव यांच्या फोटोसमोर देशाला खोटी माहिती दिली असाही बेधडक आरोप राहुल गांधी यांनी केला होता. त्यांची ही सगळीच विधाने किती बेछूट होती ते आता लष्कराच्या या संदर्भातील स्पष्टीकरणानंतर स्पष्ट झाले आहे. अग्निवीर अजय कुमार यांनी कर्तव्य बजावत असताना प्राण गमावल्यानंतर त्यांच्या कुटुंबियांना कोणताही मोबदला देण्यात आलेला नाही असे दावे समाजमाध्यमांवर केले गेल्याचे ध्यानात आल्यानंतर हा खुलासा करण्यात येतो आहे असे म्हणत लष्कराने या संदर्भातील स्पष्टीकरण एक्सवरच जाहीर केले आहे. अग्निवीर अजय कुमार यांनी दिलेल्या बलिदानाबद्दल भारतीय लष्कर त्यांना मानवंदना देते. त्यांचे अंतिम संस्कारही संपूर्ण लष्करी इतमामातच पार पाडण्यात आले. त्यांच्या कुटुंबियांना देय असलेल्या एकूण रकमेपैकी ९८.३९ लाख रूपये इतकी रक्कम यापूर्वीच देण्यात आली असून त्याखेरीजच्या अन्य सवलती व लाभ यांची अंदाजे ६७ लाख रुपये इतकी रक्कम त्यांना अग्निवीर योजनेंतर्गत देय असून पोलीस पडताळणीनंतर कुटुंबियांना ही अंतिम रक्कम दिली जाईल असे लष्कराने म्हटले आहे. कुटुंबाला मिळावयाची एकूण रक्कम सुमारे १.६५ कोटी रूपये इतकी आहे. सेवा बजावताना सर्वोच्च बलिदान करणाऱ्या सैनिकांच्या कुटुंबियांना द्यावयाची रक्कम ही कायमच शक्य तितक्या लवकर दिली जाते. अग्निवीरांच्या कुटुंबियांनाही ती मिळते असे स्पष्टपणे या खुलाशात नमूद करण्यात आले आहे. संबंधित अग्निवीराच्या कुटुंबानेही ही रक्कम मिळाल्याचे कबूल केल्याने काँग्रेस पक्ष स्वार्थासाठी किती आणि कुठवर खोटे बोलू शकतो हे आता पुरते स्पष्ट झाले आहे.**

# उधाणाचा नैसर्गिक आपत्तीत समावेश करावा



**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

पावसाळ्यात समुद्राला मोठे उधाण येत असते तसेच इतर वेळीदेखील समुद्राला उधाण येते. या उधाणाचा किनारपट्टीवरील गावांना फटका बसतो. खारजमिनींमध्ये, उधाणचे शेतात पाणी घुसते. गावांत, वस्तीमध्ये पाणी शिरते. उधाणाच्या पाण्यामुळे शेतीचे, घरांचे नुकसान होते. शासनाच्या निकषानुसार पूर, अतिवृष्टी, दरड, वादळे यांचा नैसर्गिक आपत्तीत समावेश आहे. समुद्राला येणाऱ्या उधाणाचा नैसर्गिक आपत्तीमध्ये समावेश करण्यात आलेला नाही. उधाणाच्या आपत्तीचा नैसर्गिक आपत्तीत समावेश नसल्याने शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळत नाही. ही बाब लक्षात घेऊन समुद्राला येणाऱ्या मोठ्या उधाणाचा नैसर्गिक आपत्तीत समावेश करण्यात यावा अशी मागणी खारेपाटातील शेतकऱ्यांकडून गेली कित्येक वर्षे केली जात आहे, परंतु ती मंजूर होत नाही. शेतकऱ्यांच्या या मागणीचा शासनाने विचार केला पाहिजे.

कोकणात रायगड, रत्नागिरी, ठाणे आणि पालघर या पाच जिल्ह्यात ४९ हजार ११३ हेक्टर एवढे खारभूमी लाभक्षेत्र आहे. यामध्ये रायगड जिल्ह्यातील २१ हजार २९६ हेक्टर खारभूमी क्षेत्राचा समावेश आहे. यातील अलिबाग तालुक्यातील तीन हजार १६ हेक्टर खारभूमी क्षेत्र उधाणामुळे कायमचे नापिक झाले आहे.

समुद्रांना येणाऱ्या उधाणामुळे किनारपट्टीवरील गावांना सातत्याने तडाखा बसतो आहे. खारबंदिस्ती फुटल्याने समुद्राचे पाणी शेतात आणि गावात शिरण्याच्या घटना वाढल्या आहेत. त्यामुळे शेतकरी धास्तावले आहेत. समुद्राला येणाऱ्या उधाणांमुळे गेल्या दोन दशकात अलिबाग तालुक्यातील खारेपाट विभागातील शेती कायमची नापिक झाली आहे. पूर्वी ज्या ठिकाणी शेती केली जात होती अशा साडेतीन हजार हेक्टर क्षेत्रावर आज कांदळवने पसरली आहेत. येथील शेतकरी हे शेतीपासून कायमचे दुरावले गेले आहेत. यात प्रामुख्याने माणकुळे, बहिराचा पाडा, नारंगीखार, रामकोठा, सोनकोठा, हाशिवरे, कवाडे, फुफादेवी, मेढेखार, मिळकतखार, शहाबाज यासारख्या गावातील शेतजमिनींचा समावेश आहे, मात्र शेती नापिक होऊनही शेतकऱ्यांना शासनाकडून एक रुपयाची मदत मिळू शकलेली नाही.


समुद्राला येणाऱ्या उधाणापासून संरक्षण व्हावे म्हणून किनारपट्टीवरील भागात खारबंदिस्ती केली जाते. या बांधबंदिस्तीची जबाबदारी खारभूमी विभागाकडे असते. निधीअभावी बरेचदा बंधाऱ्यांची देखभाल योग्य प्रकारे होत नाही. उधाणामुळे खारभूमी योजनांच्या या बंधाऱ्याला तडे जातात. यामुळे उधारणाचे पाणी लगतच्या शेतजमिनी शिरते आणि त्या नापिक होतात.

याचा तिहेरी परिणाम खारेपाट विभागातील शेतीवर दिसून येतो. एकीकडे शेतीतून मिळणारे उत्पन्न बंद होते. दुसरीकडे शेतमजुरांवर बेरोजगारीची समस्या उद्भवते. तिसरी महत्त्वाची बाब म्हणजे समुद्राला येणाऱ्या या उधाणांचा शासनाच्या नैसर्गिक आपत्तीमध्ये समावेश होत नाही. त्यामुळे शेतीचे नुकसान झाले तरी शेतकऱ्यांना मदत मिळू शकत नाही. पूर, अतिवृष्टी, चक्रीवादळे, भूस्खलन याप्रमाणे समुद्राला येणारी महाकाय उधाणे ही नैसर्गिक आपत्ती आहे, पण शासनदरबारी अद्याप त्यांची नोंद झालेली नाही. यामुळेच शेतकरी मदतीपासून वंचित राहतात.

समुद्राला येणाऱ्या उधाणाचा नैसर्गिक आपत्तीत समावेश नसल्याने कोकणातील शेतकरी मदतीपासून वंचित राहिले आहेत. शासनाकडे गेली आठ ते नऊ वर्षांपासून याबाबत आम्ही पाठपुरावा करीत आहोत, मात्र याबाबत धोरणात्मक निर्णय होऊ शकलेला नाही.

उधाणाचे पाणी घुसून शेतजमीन नापिक होऊ नये म्हणून शासनाने खारबंदिस्ती बांधल्या. त्यामुळे शेतजमिनीचे संरक्षण झाले, परंतु कित्येक वर्षे या बंदिस्तींची दुरस्ती झाली नाही. त्यामुळे बंदिस्तींना भगदाड पडली. त्यातून उधाणाचे पाणी शेतात शिरू लागले. हे प्रमाण वाढले. पूर्वी पाणी शेतात घुसत होते. आता उधाणाचे पाणी गावात, वस्तीत शिरू लागले. पावसाळ्यात मोठी भरती आली की अलिबाग तालुक्यातील काही गावांमध्ये पाणी शिरून नुकसान होते. त्यामुळे या भागातील शेतकरी नुकसानभरपाईची मागणी करतात. त्यांची मागणी रास्त आहे. खरबंदिस्ती दुरुस्त न केल्यामुळे पाणी गावात शिरते. शासनाच्या वेगवेगळ्या विभागांमध्ये समन्वय नसल्याने काही खारबंदिस्ती प्रकल्प रखडले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. शासानाच्या वेगवेगळ्या विभागांनी समन्वय साधून खारबंदीस्तीची दुरूस्ती करावी. समुद्राला येणाऱ्या मोठ्या उधाणांचा नैसर्गिक आपत्तीत समावेश करण्यात यावा, अशी मागणी शेतकरी करीत आहेत. त्याचादेखील शासनाने विचार केला पाहिजे.

# हिंदुस्थानी शास्त्रीय गायक हजरत इनायत खान



हजरत इनायत खान सुफी पंथाचे प्रचारक व संगीतकार होते. त टिपू सुलतानच्या वंशातले होते. ५ जुलै १८८२ रोजी त्यांचा जन्म झाला. हजरत इनायत खान हा सुफी संगीतकार हिंदुस्थानी संगीत घेऊन प्रथम इंग्लंड-अमेरिकेत पोहचले ते होते १९१० साल. या गोष्टीला १००हून अधिक वर्षे झाली. त्या काळी हजरत इनायत खानचे सर्वत्र स्वागत झाले आणि कोलंबिया विद्यापीठात त्यांचे वादनाचे कार्यक्रमही झाले.

हजरत इनायत खान हे १७ वर्षे अमेरिका आणि इंग्लंडमध्ये काम करीत होते. या सतरा वर्षात त्यांनी अनेक लेख लिहिले जे पुढे 'दि सुफी मैसेज ऑफ हज़रत इनायत खान' या नावाने प्रकाशित झाले. लंडनमध्ये हजरत इनायत खान यांची भेट रवींद्रनाथ टागोर यांच्याशी झाली होती. टागोर यांनी आपल्या मित्रांकडे भेट हजरत इनायत खान यांची भेट बॅ. महात्मा गांधीशी घालून दिली.

ब्रिटिश गुप्तहेर नूर इनायत खान या हजरत इनायत खान यांच्या कन्या होत. हजरत इनायत खान यांनी अमेरिकेन नागरिक ओरा रे बेकर यांच्याशी लग्न केले होते. अमेरिकेत रामकृष्ण मिशनच्या आश्रमात त्या दोघांची भेट झाली होती. नूर इनायत खान यांचा जन्म जानेवारी १९१४मध्ये मॉस्कोत झाला. नूर यांचे बालपण पॅरिसमध्ये गेले. दुसऱ्या महायुद्धात जर्मनीने पॅरिसचा ताबा घेतला, तेव्हा नूरचं कुटुंब लंडनला स्थलांतरित झाले.

दुसऱ्या महायुद्धात त्यांनी ब्रिटिशांसाठी गुप्तहेर म्हणून काम केले होते. त्या लंडनहून पॅरिसला जाणाऱ्या पहिल्या महिला रेडिओ ऑपरेटर होत्या. तिथं त्यांनी मॅडेलेइन या गुप्त नावाने तीन महिने काम केले. नूर यांनी फ्रान्समध्ये त्यांचे गुप्तहेराचे काम सुरूच ठेवले होते. ही अटक धोक्याने झाली होती. त्यांच्या एका सहकारी मित्राच्या बहिणीने त्यांची माहिती जर्मन पोलिसांना दिली होती. त्यातून त्यांना अटक झाली. नूर यांचा जर्मन पोलिसांनी फार छळ केला, पण ब्रिटनच्या गुप्त मोहिमेची कसलीही माहिती त्यांनी पोलिसांना दिली नाही.

एक वर्ष त्या जर्मनीच्या कैदेत होत्या. त्यानंतर त्यांना दक्षिण जर्मनीतील छळछावणीत पाठवण्यात आले. तिथंही त्यांचा छळ करण्यात आला, पण त्याचे खरे नावही पोलिसांना कळू शकलं नाही. ज्या वेळी त्यांना गोळी घालण्यात आली, तेव्हाचे त्यांचे अखेरचे शब्द होते, लिबर्ते (मुक्ती)!

दरम्यान, हजरत इनायत खान यांचे ५ फेब्रुवारी १९२७ रोजी निधन झाले. **-संजीव वेलणकर**



## बदलते तंत्रज्ञान

### एआयमध्ये रिझ्युमे बनणार; 'असा' टूल्सचा वापर होणार

नोकरी शोधण्यासाठी सोशल मीडियावर अनेक ॲप्स आहेत. यामध्ये लिंक्डइनचासुद्धा समावेश आहे. येथे बरेच जण नोकरी शोधण्यासाठी लिंक्डइनचा वापर करतात. लिंक्डइनवर अनेक प्रोफेशनल लोकांचे अकाउंट आहे. प्रोफेशनल लोकांशी कनेक्ट राहण्यासाठी सहसा या ॲपचा वापर केला जातो, तर आता LinkedIn युजर्ससाठी काही एआय फीचर्स घेऊन आली आहे. यामध्ये तुम्हाला नोकरी शोधणे, रिझ्युमे बनवणे, प्रोफेशनल लोकांशी वैयक्तिक सल्ला घेणे शक्य होणार आहे.




LinkedIn नवीन कृत्रिम बुद्धिमत्ता फीचर्स आणत आहे, जे युजर्सना प्लॅटफॉर्मवर नोकरी शोधण्यात आणि वैयक्तिक शिकण्यास मदत करेल. LinkedInने गुरुवारी जाहीर केल्यानुसार, एआय फीचर्समध्ये एक जॉबसीकर कोच असणार आहे, जो मजकूर प्रॉम्प्टवरून युजर्ससाठी योग्य नोकरी शोधू शकतो. म्हणजेच युजर्सना आवडत्या नोकरीसाठी फक्त एक प्रॉम्प्ट द्यावा लागेल. त्यानंतर एआय टूल तुम्हाला कीवर्डशी संबंधित जॉब दाखवेल. सध्या हे टूल फक्त इंग्रजी भाषेला सपोर्ट करते आहे. हे एआय फीचर्स युजर्सना रिझ्युमे आणि ॲप्लिकेशन्सचे रिव्ह्यू करण्याचे टूल, एक चॅटबॉट जो तुम्हाला कव्हर लेटर तयार करण्यासाठी तर प्रोफेशनल सल्ला देण्यात मदत करेल. ही फीचर्स सध्या प्लॅटफॉर्मच्या प्रीमियम वापरकर्त्यांसाठी जागतिक स्तरावर आणली जाणार आहेत.

आता लिंक्डइनवर एआय सपोर्ट असलेला चॅटबॉटही आला आहे. हा चॅटबॉट नोकऱ्यादेखील शोधेल आणि नोटीफीकेशन्सच्या आधारे तुम्हाला माहिती देईल. उदाहरणार्थ, 'माझ्यासाठी सायबर सिक्युरिटीमध्ये नोकरी शोधा' असा तुम्ही एक प्रॉम्प्ट जरी दिला तर त्याविषयी एआय चॅटबॉट तुम्हाला काही पर्याय सुचवेल. या एआय बॉट्सना वास्तविक तज्ज्ञांकडून प्रशिक्षण दिले जाते, असा दावा कंपनीने केला आहे.

तज्ज्ञांचा सल्ला : प्लॅटफॉर्म व्यावसायिकांना सल्ला आणि नवीन कौशल्ये शिकण्यास मदत करण्यासाठी तज्ज्ञांचा सल्ला हे एक नवीन फीचर घेऊन येत आहे. म्हणजेच लिंक्डइन प्रीमियम युजर्स बिझनेस लीडर्स आणि प्रशिक्षकांकडून वैयक्तिक सल्ला घेऊ शकतात. LinkedInने वापरकर्त्यांसाठी एआय फीचर्स आणण्यास सुरुवात केली आहे, पण हे फीचर्स सगळ्या युजर्ससाठी लागू होण्यास काही दिवस लागू शकतात.

# रहस्यकथाकार बाबुराव अर्नाळकर



**निमित्त**

रहस्यकथा लेखक चंद्रकांत सखाराम चव्हाण उर्फ बाबुराव अर्नाळकर यांचा आज स्मृतिदिन. चंद्रकांत चव्हाण हे बाबूराव अर्नाळकर या टोपणनावाने लिहिणारे मराठी लेखक होते. त्यांचा जन्म ९ जून १९०६ रोजी झाला. मॅट्रिकच्या वर्गात असताना शाळा सोडलेले बाबूराव मराठीतील आघाडीचे रहस्यकथा लेखक होते. त्यांनी एकूण १०४२ रहस्यकथा लिहिल्या.

खऱ्या अर्थाने त्यांनी तळागाळातल्या माणसांना मराठी वाचनाची गोडी लावली. चार आणे मालांपासून त्यांनी सुरुवात केली. त्यांचे नायक झुंजार, धनंजय-छोटू, मेजर सुदर्शन, इन्स्पेक्टर दिलीप, दर्यासारंग हे मराठी घरांघरांतून फिरले. तत्कालीन लोकप्रिय कादंबरीकार ना.सी. फडके यांच्या कादंबऱ्यांपेक्षा जास्त प्रमाणात विद्यार्थ्यांनी बाबुराव अर्नाळकरांच्या कादंबऱ्या चोरून वाचल्या. ज्या काळात साने गुरुजी आणि वि. स. खांडेकर यांचे आणि ऐतिहासिक चरित्रांचे वाचन हेच शालेय विद्यार्थ्यांसाठी योग्य समजले जात होते त्या काळात मुखपृष्ठावर पाठीत सुरा खुपसलेला मृतदेह आणि किंचाळणारी स्त्री असली चित्रे असलेली बाबूरावांची पुस्तके चोरूनच वाचली जात.

१९४२च्या चळवळीत तुरुंगात असताना 'सामान्य माणसासाठी लिही' असे बाबुरावांना सांगण्यात आले. सामान्य माणसाकरिता लिहायचे म्हणजे काय हे बाबुरावांना पडलेले कोडे होते. बाबुरावांना नाटकाची आवड होती. एका नाट्यक्लबाचे ते सभासद होते. त्या नाट्यक्लबातून ते एकदा विजयदुर्ग किल्ल्यात गेले आणि परत आल्यावर त्यांनी 'सतीची समाधी' नावाची गोष्ट लिहिली, ती अस्नोडकरांच्या 'करमणूक'मधून प्रसिद्ध झाली. त्याच दिवशी बाबुरावांना नाटककार अच्युत बळवंत कोल्हटकर भेटले. छान गोष्ट आहे, ते म्हणाले. एका मोठ्या माणसाला तुझी गोष्ट खूप आवडली आहे असे म्हणून ते बाबुबावांना नाथ माधव यांच्याकडे घेऊन गेले. नाथ माधवांनी अशाच रहस्यकथा लिही असे सुचवले. बाबूरावांनी मग लेखणी हाती घेतली, ती अखेरच्या श्वासापर्यंत खाली ठेवली नाही.

येरवड्याच्या तुरुंगात असताना विसापूरच्या तुरुंगातील काही राजकीय कैद्यांनी लढा देऊन सर्वच तुरुंगांतील राजकीय कैद्यांना वाचनासाठी पुस्तके पाठवावयास शासनाला भाग पाडले. अशा काही पुस्तकांतून एडगर वॅलेस यांची 'थ्री जस्ट मेन' ही कथा बाबुराव अर्नाळकर यांच्या हाती पडली आणि सामान्यांसाठी काय लिहायचे ते समजले. बाबुरावांचे स्नेही प्रभू हे रहस्यमाला काढीत असत. १९४२च्या फेब्रुवारीत बाबुरावांनी लिहिलेली 'चौकटची राणी' ही पहिली रहस्यकथा पुस्तकरूपाने प्रकाशित झाली. बाबुरावांच्या कथांना पाश्चात्त्य कथांचा आधार असायचा, पण त्या कथांना मराठीत लिहिताना महाराष्ट्रीय वातावरणाचा साज असायचा. कथेत कुठेही अश्लीलपण येऊ न देण्याची खबरदारी बाबूराव घेत आणि कथेचा शेवट नेहमी 'सत्यमेव जयते' असाच असे. कथेतील प्रसंग वेगळे असले तरी नायक एकच ठेवायचा हे बाबुरावांनी निश्चित केले होते. नायकाचे नाव बाबुरावांना गीता वाचताना सुचले आणि त्यांनी धनंजय हे नाव मुक्रर केले. बाबूरावांचा कथानायक रुबाबदार, सुस्वभावी, समयसूचक आणि धडाडीचा असल्याने वाचकांना त्याच्या गुणविशेषांची, वागण्याची, बोलण्या चालण्याची चांगलीच ओळख असे. अशा या महान रहस्यकथाकाराचे ५ जुलै १९९६ रोजी निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**खालापूर : तालुक्यातील पोखरवाडी आणि सोंडेवाडी तलावाच्या बंधारासदृश मिनी धबधब्यावर पर्यटक वर्षासहलीसाठी येत असतात. यंदा मात्र येथे पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे. त्यामुळे येथे सध्या पर्यटक येत नाहीत.**

## आरोग्य प्रहर

### मिरची खाणे 'या' चार आजारांमध्ये फायदेशीर

हिरवी मिरची आपल्या घरांमध्ये असतेच आणि आपण त्यांचा वापर भाज्या आणि सॅलड बनवण्यासाठी करतो. पण, जर आपण म्हटलं की रोज अख्खी हिरवी मिरची खावी. तर, तुम्ही का विचाराल का? कारण हिरवी मिरची खाण्याचे अनेक फायदे आहेत.

सर्वप्रथम हिरव्या मिरचीमध्ये व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी व व्हिटॅमिन बी ६ असतं. यानंतर त्यात कॅप्सेसिन, कॅरोटीन, क्रिप्टोक्सॅन्थिन, ल्युटीन आणि झेक्सॅन्थिनसारखे अनेक अँटीऑक्सिडंट असतात. काही आजार आहेत, ज्यात हिरवी मिरची खाणे आवश्यक आहे. चला, जाणून घेऊया त्या आजारांबद्दल.



**हाय बीपीसाठी -** उच्च रक्तदाबाच्या रुग्णांनी हिरवी मिरची खावी. कारण हिरव्या मिरचीमध्ये आढळणाऱ्या कॅप्सेसिनच्या संपर्कात आल्यावर रक्तवाहिन्या शिथिल होतात. त्यांना आराम वाटतो. तसेच यातील सायट्रिक सिड रक्त पातळ करण्याचे काम करते, ज्यामुळे हाय बीपीची समस्या नियंत्रणात राहते.

**संधिवातावर -** हिरवी मिरची ही दाहक-विरोधी असते म्हणजेच ती वेदना कमी करते. संधिवात आणि ऑस्टियोआर्थराइटिस असलेल्या रुग्णांसाठी याचा वापर खूप फायदेशीर मानला जातो. हे हाडांमधील सूज आणि वेदना कमी करते, ज्यामुळे ऑस्टियोआर्थराइटिसच्या रुग्णांना आराम मिळतो.

**व्हिटॅमिन सीच्या कमतरतेसाठी -** व्हिटॅमिन सीच्या कमतरतेमुळे प्रतिकारशक्ती कमकुवत होते आणि तुम्ही कोणत्याही संसर्गास संवेदनशील बनता. अशा परिस्थितीत व्हिटॅमिन सी समृद्ध हिरव्या मिरची खाऊन शरीरातील व्हिटॅमिन सीची कमतरता दूर होते आणि प्रतिकारशक्ती वाढते.

**कमकुवत दृष्टीसाठी -** हिरव्या मिरचीमध्ये असलेले व्हिटॅमिन ए हे आवश्यक पोषक तत्वांपैकी एक आहे, जे डोळ्यांची दृष्टी वाढवण्यासाठी उपयुक्त आहे. हे वय-संबंधित दृष्टी खराब होण्यापासून संरक्षण करते आणि मोतीबिंदू सारख्या डोळ्यांच्या आजाराचा धोका कमी करते.

**हिरवी मिरची खाण्याची योग्य पद्धत -** दुपारच्या किंवा रात्रीच्या जेवणात रोज मीठ टाकून १ किंवा २ हिरव्या मिरच्या कच्च्या खाव्यात. असं खाण्याची सवय नसेल तर सुक्या भाकरीसोबत खा. अशा प्रकारे नियमितपणे खाल्ल्याने या समस्यांपासून बचाव होईल किंवा या आजारांवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल, मात्र तुम्हाला इतर कोणता आजार असल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने हिरव्या मिरच्या खा.

## निवडक

### एम.बी. मोरे स्कूलमध्ये वृक्षारोपण



**रोहे** : एम. बी. मोरे फाउंडेशनच्या इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये बुधवारी (दि.३) वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात इयत्ता पहिली ते १०वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी फळझाडे, फुलझाडे, औषधी वनस्पती अशी विविध प्रकारच्या रोपांची लागवड शाळेच्या परिसरात करून उत्साहाने सहभाग दर्शविला. वृक्षतोडीसारख्या गंभीर विषयावर विद्यार्थ्यांमार्फत नाटक सादर करण्यात आले व त्यातून झाडे लावा, झाडे जगवा पर्यावरणाचे रक्षण करा याचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापिका तेजल सावंत यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाचे नियोजन शिक्षिका दर्शना बामुगडे व जागृती देशमुख यांनी केले.

### पोयनाडमध्ये ‘एक पौधा एक संकल्प’



**अलिबाग** : पोयनाड येथील झुंझार युवक मंडळाच्या वतीने गुरुवारी (दि.४) एक पौधा एक संकल्प कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. माणुसकी प्रतिष्ठानकडून मंडळाला मोफत विविध रोपे देण्यात आली. या रोपांचे पोयनाडच्या मैदानालगत व परिसरातील मोकळ्या जागेत लागवड करून त्यांचे सुरक्षित संगोपन करण्याचा संकल्प प्रत्येक सदस्याने केला. आतापर्यंत ‘झुंझार’च्या वतीने क्रीडांगण परिसरात १०० पेक्षा जास्त रोपांची लागवड करून त्यांचे व्यवस्थित संगोपन केले आहे. या वेळी झुंझारचे अध्यक्ष अन्वर बुराण, पोयनाडचे मंडळ अधिकारी महेश निकम, चरीचे मंडळ अधिकारी सूर्यकांत विधाते, सचिव किशोर तावडे, खजिनदार दिपक साळवी, अनंत राऊत, अजय टेमकर, अ‍ॅड. पंकज पंडित, राजेंद्र जाधव उपस्थित होते.

### जिंदाल रुग्णालयात आरोग्य तपासणी

**नागोठणे** : ऐनघर ग्रामपंचायत हद्दीतील बी.सी. जिंदाल रुग्णालय सुकेळी यांच्या सौजन्याने १२ व १९ जुलै रोजी दोन वेगवेगळ्या आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. १२ जुलै रोजी अनिमिया अर्थात शरीरातील रक्ताचे प्रमाण कमी झाल्याने येणारा अशक्तपणा यावर तर १९ जुलै रोजी ब्लड शुगर अशा दोन आजारांवर आधारीत शिबिर होणार आहे. या शिबिरांमध्ये उपस्थित रुग्णांच्या रक्ताची तपासणी करून तत्काळ उपचार व मार्गदर्शन जिंदल रुग्णालयाचे मुख्य डॉ. गोपाल परमार करणार आहेत. अधिक माहितीसाठी (९७६४२६५४७२) या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# खोपोलीत वीज वितरणविरोधात सर्वपक्षीयांसह नागरिक एकवटले

## बैठकीत अधिकार्‍यांना विचारला जाब



**खोपोली : प्रतिनिधी**

वारंवार व कोणतीही पूर्वसूचना न देता खंडित होणारा वीजपुरवठा, स्थानिक वीज वितरण प्रणालातील त्रुटी व कर्मचारी आणि अधिकार्‍यांची मनमानीविरोधात खोपोलीत जनभावना अत्यंत संतप्त आहेत. दोन दिवसांपूर्वी सामाजिक कार्यकर्त्यांनी याबाबत वीज वितरण कंपनी खोपोली कार्यालयात धाव घेत संबंधित अधिकार्‍यांना जाब विचारून धरणे आंदोलन केले होते. तरीही कोणताही ठोस बदल होत नसल्याने वीज वितरणविरोधात आता शहरातील सर्वपक्षीय नेते एकवटले आहेत.

माजी नगराध्यक्ष व वरिष्ठ नेते दत्ताजी मसुरकर यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी (दि.३) येथील लोहाणा सभागृहात सर्व पक्षीय नेते, पदाधिकार्‍यांनी बैठक झाली. यात खोपोलीतील वीज वितरणमधील तांत्रिक त्रुटी, वारंवार होत असलेला खंडित वीजपुरवठा व त्या मागील वास्तविक कारणे, यंत्रणेत सतत होत असलेला बिघाड, प्रस्तावित भुयारी वीजजोडणी यंत्रणा प्रकल्प याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीत उपस्थित तज्ज्ञांनीही वीजपुरवठा खंडित होण्याची कारणे व त्यावरील उपायांबाबत माहिती दिली. दत्ताजी मसुरकर यांनीही भुयारी प्रकल्प कशामुळे रखडला याची माहिती दिली.

शेवटी खोपोली वीज वितरण यंत्रणेत तांत्रिक बदलासाठी तज्ज्ञ अधिकारी व कर्मचार्‍यांची नियुक्ती व्हावी, तसेच यंत्रसामग्री, त्यासाठी लागणारा निधी व मंजुरी मिळण्यासाठी अधीक्षक अभियंता, राज्य वीज वितरण, ऊर्जा सचिव व मंत्री यांच्यासोबतही चर्चा करण्यासाठी सर्वपक्षीय नेत्यांनी पुढाकार घेण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. यासाठी स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांचे सहकार्य घेऊन वीज वितरणच्या प्रश्नावर तातडीने उपाययोजना होण्यासाठी पाठपुरावा करण्याचे ठरविण्यात आले.

खोपोली शहरासाठी १५३ कोटींचा निधी अंडरग्राऊड केबलसाठी उपलब्ध करावा. यासाठी शासनस्तरावर सर्वपक्षीय नेते मदत करू, असे अश्वासन माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर यांनी देत ३० जुलैपर्यंत वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले नाही तर गंभीर निर्णय घेऊ, असा इशाराही मसुरकर व माजी नगराध्यक्ष सुनील पाटील यांनी दिला.

बैठकीला माजी नगरसेवक मोहन औसरमल, उल्हासराव देशमुख, डॉ. शेखर जांभळे, शिवसेना तालुका प्रमुख एकनाथ पिंगळे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष मनेष यादव, शिवसेना शहर प्रमुख संदीप पाटील, अतुल पाटील, कैलास गायकवाड, रवींद्र रोकडे, वंचित आघाडीचे शहर अध्यक्ष दिपक गायकवाड, भाजपचे शहर अध्यक्ष रमेश रेटरेकर, माजी नगरसेवक राजू गायकवाड, वीज वितरणचे रायगड अधीक्षक अभियंता राजाराम माने, पनवेल ग्रामीण कार्यकारी अभियंता संजय ठाकूर, खालापूर उपकार्यकारी अभियंता महादेव मुंढे, खोपोली उपकार्यवारी अभियंता सतीश गडरी, खालापूर सहाय्यक अभियंता प्रवीण शेडगे यांच्यासह सामाजिक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# शिक्षणाधिकार्‍यांच्या आश्वासनानंतर शिक्षक परिषदेचे आंदोलन स्थगित

## शिक्षकवर्गाच्या मागण्यांबाबत शासनाची सकारात्मक भूमिका

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी पुनिता गुरव यांनी प्राथमिक शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांसंदर्भात सकारात्मक भूमिका घेतली आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक परिषदेने आपले नियोजित आंदोलन स्थगित केले आहे.

शिक्षकांच्या मागण्यांबाबत वारंवार पाठपुरावा करूनदेखील प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याची भावना शिक्षकांमध्ये आहे. या संदर्भात महाराष्ट्र राज्य शिक्षक परीषद प्राथमिक विभागाच्या वतीने गुरुवारी धरणे आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला होता. यानंतर शिक्षणाधिकारी पुनिता गुरव यांनी परिषदेच्या पदाधिकार्‍यांना चर्चेसाठी बोलावले.

सोमवारी (दि.१) त्यांच्या दालनात झालेल्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा झाली. केंद्रप्रमुख रिक्त पदे पदवीधर पात्र वेतनश्रेणी घेणारे शिक्षक यांची सेवाज्येष्ठतेनुसार येत्या १० दिवसांत प्रसिद्ध करून नेमणूक करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाकडे फाईल पाठवली जाईल. रिक्त कनिष्ठ विस्तार अधिकारी शिक्षण पदे आकृतीबंध मंजूर झाल्यानंतर भरली जातील. मुख्याध्यापक पदे वेतन संरक्षण मिळालेल्या मुख्याध्यापक शिक्षकांना लवकरच नेमणुका दिल्या जातील. विज्ञान गणित घेऊन पदवीधर झालेल्या प्राथमिक शिक्षकांना विषय शिक्षक म्हणून नेमणुका दिल्या जातील.

विषय शिक्षक नेमणूक झालेल्या शिक्षकांचे उपशिक्षकपदी नेमणूक होण्याचे दिलेले प्रस्ताव त्वरीत मंजूर केले जातील. प्रलंबित वैद्यकीय बिले निधी उपलब्ध झाल्यावर लगेच दिले जाईल. पदवीधर पात्र शिक्षक, पदोन्नती मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख पात्र शिक्षकांना निवड श्रेष्ठ लवकरच मंजूर होईल असे आश्वासन पुनिता गुरव यांनी शिक्षक परिषदेच्या शिष्टमंडळाला दिले.

जिल्ह्यातील प्राथमिक शाळांची सकाळच्या शाळेची वेळ सकाळी ९ ते १ करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली. या वेळी शिक्षक परिषदेचे पदाधिकारी तसेच शिक्षण विभागातील अधिकारी उपस्थित होते.

**वेद विद्या गुरुकुलम् वारियर फाउंडेशन**
कोलखे पारपुण्ड गाँव,पलस्पा फाटा, पनवेल नवी मुंबई महाराष्ट्र, ४१०२२१
महर्षि सान्दीपनि राष्ट्रीय वेदविद्या प्रतिष्ठान,उज्जैन
(शिक्षा मन्त्रालय, भारत सरकार की स्वायत्तशासी संस्था
द्वारा तात्कालिक रुप से अनुदानित)

**आवश्यकता**
अध्यापक अंग्रेजी + गणित (संयुक्त–०१)

अंग्रेजी+गणित (संयुक्त–०१) हेतु शैक्षणिक योग्यता – आयु– न्यूनतम २५ वर्ष, अनुभव–०१ वर्ष का अनुभव बी.एससी. (गणित), पी.सी.एम. ग्रुप/फिजिक्स, केमेस्ट्री, मेथ अध्ययन किया हुआ हो अथवा बी.ए. (अंग्रेजी), स्नातक स्तर पर अंग्रेजी विषय के साथ गणित अनिवार्य है। बी.एड/ विद्या वारिधि,एम.एस.सी. (गणित) को प्राथमिकता दी जावेगी मासिक मानदेय रु.२५,०००/– अध्यापक की तात्कालिक सेवाएं **महर्षि सान्दीपनि राष्ट्रिय वेदविद्या प्रतिष्ठान,** उज्जैन के नियमानुसार होगी। अभ्यर्थी अपने सभी अभिलेखों एवं आधार कार्ड की स्व प्रमाणित छाया प्रति के साथ प्रार्थनापत्र नाम प्राचार्य ,वेद विद्या गुरुकुलम वारियर फाउंडेशन कोलखे पारपुण्ड गाँव,पलस्पा फाटा, पनवेल नवी मुंबई महाराष्ट्र, ४१०२२१ के नाम से डाक द्वारा अथवा स्वयं उपस्थित होकर अंतिम दिनांक,२० जुलाई २०२४ तक पाठशाला कार्यालय में जमा करें। अंतिम तिथि के पश्चात प्राप्त आवेदन पत्रों पर विचार नहीं किया जायेगा।

**पाठशाला का संपर्क सूत्र प्राचार्य– ९८१९०७४०९७,८६५२७१२७७२**

# मुरूड येथील बिल्डिंगमध्ये आग लागून लाखोंचे नुकसान

**मुरूड : प्रतिनिधी**



एकदरा ग्रामपंचायत हद्दीतील खोरा बंदराजवळ वास्तव करणारे अजय सुरेश शिंदे यांच्या आईच्या नावावर असणार्‍या हिरा निवास बिल्डिंगच्या दुसर्‍या मजल्यावर गुरुवारी (दि.४) पहाटेच्या दरम्यान आग लागून लाखो रुपयांचे नुकसान झाले. आग ही शॉकसर्किट झाल्याने लागली असावी, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

मनोज सतविडकर व बड्या सतविडकर हे रोजच्याप्रमाणे सकाळी उठल्यावर बाजूला असणार्‍या हिरा निवास बिल्डिंगच्या दुसर्‍या मजल्यावरून धूर व आग दिसली. त्यांनी ओरडाओरड केल्यानंतर बिल्डिंगच्या बाजूला असणार्‍या घरातील अजय शिंदे व त्यांचे कुटुंबिय बाहेर पडले. तातडीने नगर परिषद कार्यालयात अग्निशमन दलाच्या जवानांना आगीसंदर्भात माहिती देण्यात आली. अग्निशमन दलाच्या राकेश पाटील, शुभम करडे, अभिजित कारभारी, नितेश माळी, अविनाश अवघडे, सचिन कोरके या जवानांनी घटनास्थळी धाव घेत आग विझवण्यात सुरुवात केली.

शुभम करडे व मितेश माळी यांनी बिल्डींगमध्ये प्रवेश करून पहिले दोन भरलेले सिलेंडर बाहेर काढले. या आगीत लाखो रुपयांचे सामान भस्मसात झाले.

राम प्रहर
वस्तुनिष्ठ बातम्या आणि
आकर्षक जाहिरातींसाठी

**JOB VACANCY**

Work Location: Hazira, Surat based Steel Making Plant

| S.No. | Post | Vacancy | Skill | Experience | Apply here |
|---|---|---|---|---|---|
| 1 | High Skilled Crane Operator | 15 | Ladle handling 250MT with Metal Pouring & Ladle placement at caster | 5 to 15 yrs | *Arti Enterprises/ *Shree Sai |
| 2 | High Skilled technician and Lancer for Conarc and LF | 15 | Electrod Preperation, Sample temp taking and EBT filling | 5-15 yrs | *Arti Enterprises |
| 3 | Caster & Slab Yard Crane Operator | 30 | Tundish & Slab handling | 5 to 15 yrs | * M.V.Ind. Services/ *Arti Enterprises |
| 4 | Caster Mould Operator / Ladle Operator | 30 | Mould Operation/ Ladle Operation | 5 to 15 yrs | * M.V.Ind. Services |

Send your bio data through whatsapp or by email :
1 **Arti Enterprises**, Mb.No.9879395268/9909990271, email: artienterprise.135@gmail.com
2 **Shree Sai**, Mb.No.7096808836, email: saiindia.dsingh@gmail.com
3 **M.V. Industrial Services**, Mb No.9879106815/6842, mvis.india@gmail.com, rpandey555.rp@gmail.com

Interview Time: On 9/7/2024 (Tuesday) at 10.00 am to 04.00pm
Location: Hotel Redwings Castle, Near to Orion Mall, New Panvel Bridge, Mumbai- Pune Highway-410206

# खारपाडा येथे ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**पेण : प्रतिनिधी**

मुंबई–गोवा महामार्गावर खारपाडा येथे रस्त्यावर ट्रकचालकाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने या अपघातात दुचाकीचालक गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला आहे.

याबाबत माहिती अशी की, फिर्यादी अमोद मुंढे (रा. गणपतीवाडी, पेण) हे व त्यांचा मित्र हे पनवेल येथून सामान खरेदी करून पेण येथे मुंबई–गोवा हायवेने दुचाकी (एमएच ०६ बीसी ६५९५)वरून घरी परतत असताना खारपाडा चौकी येथे आले असता ट्रक (एमएच ५०/१९७१)वरील आरोपी चालक मनोज राजेंद्र चौगले (रा. नावेडी कौंड, संगमेश्वर,रत्नागिरी) याने आपल्या ताब्यातील ट्रक हा बेदरकारपणे चालवून पेणहून पनवेलकडे जात असताना खारपाडा वाहतूक पोलीस चौकीसमोर त्यांच्या दुचाकीला मागून ठोकर मारली. या अपघातात दुचाकीचालक श्रेयस राजेश पवार (वय २८, रा.विजया कॉ.ओ.हाउसीग, पंतनगर चेंढरे, अलिबाग) गंभीर जखमी झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी दादर (सागरी) पोलीस ठाणे येथे ट्रकचालक मनोज चौगले याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक संदेश पाटील हे करीत आहेत.



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. ज्ञानेश्वर दत्तात्रेय पाटील रा. रोहींजण, ता. पनवेल, जि. रायगड खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत जमीन मालक १) असलम इब्राहिम जिव २) रफीक आदमजी शेख, ३) मोहम्मद अभिन इब्राहिम शेख रा वावंजे, ता. पनवेल, जि. रायगड यांज कडून सदर मिळकत विकत घेण्यच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन:**
**मौजे–निताळे, ता. उरण, जि. रायगड.**

| सर्व्हे.नं. | हिस्सा.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|
| ९६ | १/अ | ०–६०–०० <br> पो.ख. ०–०१–५० <br> एकूण ०–६१–५० <br> पैकी. ०–१७–५० | १२.०० <br> ३.२० |

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

पनवेल,
दिनांक : ०४/०७/२०२४

**सही/–**
**निलेश द. हातमोडे**
अ‍ॅडव्होकेट
मो नं ८९०८५५८२८९

पत्ता : शॉप नं १३०, मुन्सिपल शॉपींग कॉम्प्लेक्स, पहिला मजला, भाजी मार्केटजवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६

सिडको
शहरांचे शिल्पकार

**नोटीस-१**

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण ‘‘ना हरकत पत्र’’ मागणी अर्जानुसार नोटीस सर्व **मे. नियती होम्स एलएलपी तर्फे भागीदार १) दिलीप तुकाराम देरेकर २) दिनेश दत्ताराम माहुलकर ३) निमीश प्रतापराय वोरा ४) प्रवीण पंढरीनाथ देरेकर ५) समीर विठ्ठल देरेकर, राहणार – मु. पो ०१, अल मंजील, सिटीजन हाय स्कुल जवळ, उरण –४००७०२**------- (अर्जदार)

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे **मे. ऑरा बिल्डकॉन तर्फे भागीदार १) श्री. वेलजी विशा मेनात २) श्री. रणछोड शिवजी चंदात ३) श्री. हर्षल विनोद जैन** यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता ‘‘ना हरकत प्रमाणपत्रासाठी’’ मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा दिनांक | त्रिपक्षीय करारनामा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | | |
| २८७६ | १३.०६.२०२४ | पुष्पक नोड | २६ | ३६७ | ४६० चौ. मी. पैकी २३० चौ. मी. | २६.०८.२०२२ | ०७.११.२०२२ | ३०.११.२०२३ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर या कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसाच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ‘‘**ना हरकत प्रमाणपत्र**’’ देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**(स्वाक्षरी)**
**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/०५०/२०२४-२५

## निवडक



### स्वराज्य महिला प्रभाग संघाची सभा

**पनवेल, मोहोपाडा :** राज्य सरकारच्या महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) संचलित स्वराज्य महिला प्रभाग संघ केळवणेची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकताच पनवेल तालुक्यातील युसुफ मेहरअली सेंटरचे मधु प्रमिला दंडवते संकुल बांधणवाडी येथे झाली. सभेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून युवा व्याख्याते तथा महाराष्ट्र स्टुडंट युनियनचे जिल्हा सचिव शैलेश कोंडसकर, शिवक्रांती सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. विवेक भोपी, ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रायगड भूषण सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, युसूफ मेहेरअली सेंटरचे प्रकल्प संचालक अनिल कांबळे, आपटा सरपंच निकिता भोईर, पं. स. प्रभाग निरीक्षक अनंत उघडे, शिरढोण ग्रामसंघ अध्यक्ष साधना वाजेकर, तुकाराम गायकवाड, जयवंत महाडिक, मिलिंद बाचल, कल्हे सीआरपी पूर्वा कदम, कासारभट सीआरपी मयुरी म्हात्रे आदी मान्यवरांनी मार्गदर्शन केले. या वेळी उत्कृष्ट गट व्यवसाय श्रीसमर्थ स्वयंसहाय्यता समूह बारापाडा, उत्कृष्ठ उद्योजिका कासारभट येथील योजना पाटील यांच्यासह उत्तम वाटचाल करणाऱ्या १४ ग्रामसंघ व १४ सीआरपींना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

### फडके विद्यालयात गुणगौरव सोहळा

**नवीन पनवेल :** फडके विद्यालयातील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा शाळेच्या सभागृहात झाला. पनपा शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या सोहळ्याला महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या नियामक मंडळाचे सदस्य डॉ.



राजीव हजरनीस, शिक्षण प्रबोधिनीचे सहायक संचालक केदार तापीकर, भारत विकास परिषदेचे कोकण प्रांत अध्यक्ष सुबोध भिडे आदी मान्यवर उपस्थित होते. रमेश चव्हाण यांनी विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शासकीय योजनांची माहिती दिली. त्यांनी संस्थेच्या समुपदेशन क्षेत्रात सुरू असलेल्या कार्याचे कौतुक केले. डॉ. राजीव हजरनीस यांनी आपल्या भाषणात उद्योजकतेचे महत्त्व स्पष्ट केले. या वेळी गुणवंत विद्यार्थी व पालकांनी आपली मनोगते व्यक्त केली. मुखाध्यापिका समिता सोमण यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. स्वाती बापट यांनी कार्यक्रमाचे अभ्यासपूर्ण सूत्रसंचालन केले.

# एपीएमसीत ३०० टनहून अधिक बटाटा कचऱ्यात

## ओले पीक व वजन काटा बंदचा फटका





**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबई कृषि उत्पन्न कांदा बटाटा बाजारात दाखल झालेला बटाटा सडत असून तो कचऱ्यात फेकण्याची नामुष्की ओढवली आहे. एपीएमसीत उत्तर प्रदेशमधून बटाटा दाखल होता असून वजन काटा बंद असल्याने बाजारात वेळेवर गाडी विक्रीसाठी दाखल होत नाही, त्यामुळे बटाटा आणखी खराब होत असून सडत आहे. सोमवारपासून तब्बल ३०० टनाहून अधिक बटाटा सडला असून तो कचराभूमीवर फेकण्याची वेळ एपीएमसी ओढावली आहे.

एपीएमसीत दररोज बटाट्याच्या ३० ते ४० गाड्या दाखल होत आहेत. परराज्यातील उत्तर प्रदेशातून बटाटा दाखल होत आहे, परंतु पावसामुळे जागेवरून ओला बटाटा भरला जात आहे. त्यामुळे त्या ठिकाणाहून बाजारात बटाटा येण्यासाठी दोन-तीन दिवसांचा कालावधी जात आहे. पुन्हा एपीएमसी बाजारातील १५-२०दिवसांपासून वजन काटाबंद असल्याने बाहेर वजन करून बाजारात गाडी विक्रीसाठी दाखल होण्यासाठी उशीर होत आहे. परिणामी बटाट्याच्या विक्रीला विलंब होत असल्याने बटाटा मोठ्या प्रमाणावर खराब होत आहे. सोमवारपासून ही परिस्थिती अधिक बिकट होत असून बुधवारी बाजारात मोठ्या प्रमाणात बटाटा सडला होता. यामुळे बाजारात मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी पसरली होती. त्यामुळे हा सडलेला ३०० टन ते ३५० टन बटाटा तुर्भे येथील कचराभूमीवर फेकण्यात आला आहे.

एपीएमसी बाजारात उत्तर प्रदेशमधून बटाटा दाखल होत असून त्या ठिकाणाहून ओला बटाटा गाडीमध्ये भरला जात आहे. तेथून एपीएमसी बटाटा दाखल होण्यासाठी दोन ते तीन दिवस जात आहेत, तर दुसरीकडे एपीएमसीचा वजन काटा बंद असल्याने त्याच्या अभावी विक्रीसाठी बटाटा दाखल होण्यास उशीर होत आहे. या दोन्ही कारणांमुळे सध्या मोठ्या प्रमाणावर बटाटा सडत असून तो कचऱ्यात फेकावा लागत आहे. त्यामुळे बाजारात अवघा २० ते ३० टक्के उत्तम दर्जाचा बटाटा उपलब्ध आहे.

परिणामी बाजारात चांगल्या बटाट्याला जास्त मागणी असल्याने दर वधारले आहेत. आधी प्रतिकिलो २२ ते २५ रुपयांनी उपलब्ध असलेला बटाटा आता २६ ते ३० रुपयांनी विक्री होत आहे.

## नवी मुंबई पालिका शाळांतील ४९ विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या इयत्ता आठवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत नवी मुंबई महापालिका शाळा क्र. ४२ घणसोली येथील विद्यार्थिनी दिप्ती पाटील ८४.५६ टक्के गुण संपादन करीत ठाणे जिल्ह्यातील शाळांमधून पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. यावर्षी नमुंमपा शाळांमधील इयत्ता पाचवीतील २८ व इयत्ता आठवीतील २१ असे एकूण ४९ विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले असून महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा १८ फेब्रुवारी रोजी घेण्यात आली होती. यामध्ये नवी मुंबई महापालिका शाळांतून इयत्ता पाचवीतील ५५९ व इयत्ता आठवीतील ५२१ असे एकूण १०८० विद्यार्थी दोन्ही शिष्यवृत्ती परीक्षेस बसले होते. त्यापैकी इयत्ता पाचवीतील २८ विद्यार्थी व इयत्ता आठवीतील २१ विद्यार्थी अशाप्रकारे एकूण ४९ विद्यार्थी गुणवत्ता यादीमध्ये झळकले. या विद्यार्थ्यांमधून इयत्ता आठवीच्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये दिप्ती कैलास पाटील (शाळा क्र.४२, घणसोली) ही विद्यार्थिनी ८४.५६ टक्के गुण संपादन करून ठाणे जिल्ह्यातून व अर्थातच नवी मुंबई क्षेत्रातून सर्वप्रथम क्रमांकाची मानकरी ठरलेली आहे.

इयत्ता पाचवीच्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये तनुश्री निलेश टावरे (राजर्षि छत्रपती शाहू महाराज विद्यालय शाळा क्र.५५, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, रबाडे) ही विद्यार्थिनी ७८.९१ टक्के गुण प्राप्त करून नवी मुंबई क्षेत्रातून सर्वप्रथम आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४मध्ये नमुंमपाच्या सर्व शाळांतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मार्गदर्शिका, तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले होते. त्याचप्रमाणे त्यांच्या सराव परीक्षाही घेण्यात आल्या होत्या. त्यासोबतच विद्यार्थ्यांना ऑनलाईन मार्गदर्शनही करण्यात आले होते. याशिवाय शाळा स्तरावर शिक्षकांचे वैयक्तिक मार्गदर्शन, जादा तासिकांचे नियोजन करण्यात आले होते.

याचा एकत्रित परिणामातून हे यश विद्यार्थ्यांनी संपादन केले असून विद्यार्थ्यांसोबत त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचेही सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

## विद्याभवन संकुलाच्या १८ विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेतून पुणे विद्यार्थीगृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलातील १८ विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात घेतलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेची पात्र विद्यार्थ्यांची यादी अगोदरच जाहीर केली होती. शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे बुधवारी ऑनलाइन जाहीर झाली. मराठी माध्यमाच्या इयत्ता पाचवीतून ओंकार दिलीप शिंदे, नंदिनी अजित शिंदे, सोहम संदेशकुमार शिंदे, वेदांत धोंडीराम बडंगर, स्नेहल संतोष शिंदे, पियुष संतोष शिंदे, निर्मित सहादू तोडकर आणि श्रुती जगन्नाथ दगडे तर इयत्ता आठवीतून आयुष लक्ष्मण आणेकर यांची शिष्यवृत्तीसाठी निवड झाली. इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता पाचवीतून मिहीर पंढरीनाथ मिरजे, श्रीया सूरज धांद्रुत, भूमी प्रकाश शितकर व पूर्वी प्रफुल शिंदे यांची तसेच इयत्ता आठवीतून आर्या सागर नाक्ती, शिवकृष्णा पुचा, तनिष्का निरंजन धंद्रे, सुहाणी प्रसन्नकुमार कांबळे आणि नेहा संतोष मंडल यांची शिष्यवृत्तीसाठी निवड झाली. माध्यमिक मराठी विभागातून स्वप्नाली जगन्नाथ कोळी या विद्यार्थिनीने एनएमएमएस



परीक्षेत आपले स्थान पक्के केले.

पुणे विद्यार्थीगृहाचे कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे, कुलसचिव दिनेश मिसाळ, माजी कार्याध्यक्ष प्रा. कृ. ना. शिरकांडे, मुख्याध्यापक गोरख कदम, सुवर्णा मिसाळ, श्रीजा नायर, मनीषा मुळीक, पर्यवेक्षिका शोभा लवटे अस्मिता सलगार तसेच सर्व शिक्षक आणि पालकांनी शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले.

## नवी मुंबईत डासांची भूणभूण वाढली!



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

पावसाळा सुरू होताच डासांची भूणभूण सुरू झाली आहे. गेल्या आठवड्यापासून पावसाचा जोर कमी अधिक असल्याने डास वाढू लागले आहेत. सध्या पावसाचा जोर कमी झाल्याने वातावरणात कमालीचा बदल झाला आहे. कधी उन्ह तर कधी पावसाच्या हलक्या लहरी बरसत आहेत. या वातावरण बदलामुळे नवी मुंबई शहरात रोगराईचे प्रमाण वाढले असून त्यात आता डासांनी भर घातली असून नागरिक संतप्त झाले आहेत.

> **नवी मुंबई मनपाच्या आरोग्य विभागाकडून नियमित डास उत्पत्तीची ठिकाणे शोधून कार्यवाही केली जाते. पावसाळ्यात ही कार्यवाही अधिक जोरात करण्याचे आदेश देतो.**
> **-डॉ. प्रशांत जवादे, मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी, मनपा**

सध्या डोकेदुखी, अंगदुखी, खोकल्याच्या रुग्णांची संख्या शहरात झपाट्याने वाढत आहे. त्यात आता मलेरियाने शिरकाव केला आहे. काही दिवसांपासून शहरात मलेरिया रुग्णवाढ त्यात लहान मुलांनादेखील सर्दी, खोकला अशा आजारांनी घेरले आहे. पालिका तसेच खासगी दवाखान्यात सर्दी, खोकला व तापाच्या रुग्णांची संख्या वाढली आहे. अनेक दिवसांपासून हवामानात बदल झाल्याने रोगराईची संख्या वाढली आहे. खाडीकिनारी असणाऱ्या गावांना व सेक्टरमध्ये सध्या डासांनी चांगलेच घेरले आहे. नेरूळ परिसरात तर सध्या मोठ्या प्रमाणात डास वाढले आहेत. त्यात अनेक ठिकाणी बांधकामेही सुरू असल्याने ठिकठिकाणी पडलेल्या राडारोड्याने डासांची उत्पत्ती वाढत आहे. डासांच्या चाव्यामुळ नेरूळ खाडीकिनारा लगत राहणाऱ्या नागरिकांनाही डासांचा जास्त त्रास होत आहे.

मनपाकडून रासायनिक फवारणी केली जाते. आरोग्य विभागाचे कर्मचारी आवर्जून जंतुनाशक औषध फवारणी करीत असतात, मात्र असे असूनही डासांची पैदास वाढली आहे.



## राहुल गांधींच्या हिंदूविरोधी वक्तव्याविरोधात चप्पल मारो आंदोलन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

राहुल गांधींच्या हिंदूविरोधी वक्तव्याच्या विरोधात बजरंग दलातर्फे नवी मुंबईत सिवूड्स स्टेशन येथे चप्पल मारो आंदोलन करण्यात आले.

सहसंयोजक शंकर संगपाळ म्हणाले की, लोकशाहीचे सर्वोच्च मंदिर असलेल्या लोकसभेत काँग्रेसचा नेता राहुल गांधी याने हिंदू धर्मीय हिंसक आहेत, असे वक्तव्य करून देशातील बहुसंख्य करोडो हिंदूंच्या भावना दुखावल्या आहेत. यामुळेच राहुल गांधीच्या छायाचित्राला चप्पल मारो आंदोलन करण्यात आले.

या वेळी विश्व हिंदू परिषद नवी मुंबई जिल्हा सहमंत्री स्वरूप पाटील, अमरजीत सुर्वे, बजरंग दल सहसंयोजक शंकर संगपाळ, तेजस पाटील, हिंदुत्ववादी सुरेशसिंग राणा, डी. के. सिंग तसेच मोठ्या संख्येने हिंदुत्ववादी संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## 'सीकेटी'त करिअर मार्गदर्शन व्याख्यान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयात बुधवारी (दि. ३) विज्ञान समितीतर्फे बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

व्याख्यानासाठी परळ मुंबई येथील महर्षी दयानंद कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालयाचे रसायनशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. रुपेश एच. गायकवाड हे प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित होते.



आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात त्यांनी करिअरमधील विविध संधींची विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली, तसेच परदेशात करिअरची निवड कशी करावी यासाठी त्यांनी विविध मार्ग आणि कल्पना सूचविल्या. करिअर निवडताना विद्यार्थ्यांमध्ये असणारा संभ्रम, शंका यांचे त्यांनी परिसंवादातून निरसन केले. खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांना या परिसंवादातून प्रेरणा आणि ज्ञान मिळाले.

व्याख्यानासाठी ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रशांत मोरे, कला वाणिज्य विभागाचे पर्यवेक्षक अजित सोनवणे, विज्ञान विभागाच्या पर्यवेक्षिका स्वाती पाटील तसेच विज्ञान विभागाचे शिक्षक उपस्थित होते. आभार प्रदर्शनाने व्याख्यानाची सांगता झाली.



## शेतातील राब झाले हिरवेगार | बळीराजा शेतीकामात व्यस्त

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

भारतीय हवामान विभागाने नियोजित वेळेवर पाउस पडणार असल्यांचे सुचित केल्यामुळे, गेल्या काही दिवसांपासून पावसाने सातत्याने हजेरी लावल्याने शेतकरी वर्गाच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. ७ जूनला पाऊस येताच शेतकऱ्यांनी पेरणी केल्यामुळे पेरलेले राब सध्या उत्तम झाले असून, एक आठवड्यामध्ये भातलागवड होणार असल्यांचे शेतकरी बांधव म्हणत आहे.

मागील वर्षी पावसाच्या लपंडावामुळे शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले होते, मात्र या वर्षी वरुणराजाने शेतकरी बांधावांवर कृपादृष्टी केली आहे. यामुळे दुबारा पेरणीचे संकट टळले आहे. जमीन पावसान भिजल्यामुळे शेतीच्या कामाला वेग आला आहे. यामुळेच आपल्या जवळ असलेली बैलांची जोडी घेऊन शेतात उखळणी सुरू झाली आहे.

दरवर्षी पाऊस नियोजित वेळेवर पडेल याची आता शाश्वती राहली नाही, मात्र शेतात राब पेरणी केल्यानंतर पाऊस मौनरुप धारण केल्यामुळे शेतातील राब करपून जात असतात, मात्र या वर्षी वरुणराजाने बळीराजावर चांगली कृपादृष्टी ठेवली असल्यामुळे अशीच कृपादृष्टी राहो, असे साकडे बळीराजा घालत आहे.

## 'लाडकी बहीण'साठी स्वतंत्र कक्ष आणि अधिकाऱ्यांची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पामध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर करून महाराष्ट्रातील सर्वसामान्य महिलांचा सन्मान केलेला आहे. या योजनेची अंमलबजावणी गतिमान पद्धतीने महापालिका क्षेत्रातील महिलांसाठी व्हावी म्हणून पनवेल महापालिकेच्या वतीने स्वतंत्र कक्षाची आणि सक्षम अधिकार्याची नेमणूक करावी, अशी मागणी पनवेलचे माजी नगरसेवक राष्ट्रवादीचे शिवदास कांबळे यांनी आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे केली आहे.

योजना गतिमान पद्धतीने राबवून शासनाचे धोरण सर्वसामान्य महिलांपर्यंत पोहचवण्यासाठी सगळे नागरिक यासाठी आपल्या महापालिकेला मदत करतील, असेही त्यांनी या पत्रकामध्ये म्हटले आहे. वयोगट २१ ते ६० यामधील महिलांनी या योजनेचा लाभ घेऊन आपण आपला विकास साधावा, अशी विनंतीही केली आहे.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयातर्फे माती परीक्षण पर्यावरणीय उपक्रम



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातर्फे गुरुवारी (दि.४) माती परीक्षण हा पर्यावरणीय उपक्रम घेण्यात आला.

या उपक्रमासाठी रसायनशास्त्र विभागातील द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनी ओवेपेठ येथील शेतामध्ये जाऊन तेथील मातीचे परीक्षण करून ती माती पुढील ॲनालिसिस करण्यासाठी प्रयोगशाळेमध्ये घेऊन आले. या उपक्रमामुळे पनवेल तालुक्यातील वेगवेगळ्या गावातील शेतकऱ्यांना मातीबद्दल माहिती व उत्पादनात भरपूर अशी वाढ होईल. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींचे मातीचे परीक्षण केल्याबद्दल अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. महेश्वरी झिरपे रसायनशास्त्र विभागप्रमुख यांनी केले, तसेच प्रा. डॉ. दीपिका हसीजा, प्रा. डॉ. नीलम लोहकरे व प्रा. रूपाली नागरेकर व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# कर्जत येथे ग्रामीण जीवनोन्नती अभियानाला व्यवस्थापकाची प्रतीक्षा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील महिला बचत गटांकडून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम ग्रामीण जीवनोन्नती अभियानकडून राबविले जात आहे. या अभियानाचे तालुका व्यवस्थापक हे पद गेली दोन महिन्यापासून रिक्त आहे. सध्या प्रभारी तालुका व्यवस्थापकांकडे पदभार असून तालुक्यासाठी ग्रामीण जीवनोन्नती अभियानला पूर्णवेळ तालुका व्यवस्थापक मिळावा, अशी मागणी कर्जत तालुक्यातील महिला समूह संसाधन व्यक्ती यांच्याकडून करण्यात येत आहे.



कर्जत पंचायत समितीचे माजी सभापती आणि युवासेना तालुका अधिकारी अमर मिसाळ यांच्या माध्यमातून अशी ज्येष्ठ समूह संसाधन व्यक्ती शोभा शेंडे आणि रेखा हिरेमठ यांच्या नेतृत्वाखाली ४२ महिला समूह व्यक्तींनी खासदार श्रीरंग बारणे आणि आमदार महेंद्र थोरवे यांची भेट घेऊन पूर्ण वेळ व्यवस्थापक असावेत यासाठी भेट घेतली.

कर्जत तालुक्यात दोन हजार महिला बचत गट असून या बचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण जीवनोन्नती अभियान महिला सक्षमीकरणाचे काम करून घेत असतात. या ग्रामीण जीवनोन्नती अभियानच्या तालुका व्यवस्थापक तेलवणे यांची बदली झाली आहे. त्यामुळे या कार्यालयातील अधिकारी यांच्याकडे ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे प्रभारी तालुका व्यवस्थापकपदाची जबाबदारी देण्यात आली आहे, मात्र तालुक्याची बचत गटांची संख्या लक्षात घेऊन ग्रामीण जीवनोन्नती अभियानासाठी पूर्णवेळ तालुका व्यवस्थापक अधिकाऱ्यांची नेमणूक शासनाने करावी ही मागणी होती.

आमदार थोरवे यांनी जुलै महिन्यात पूर्णवेळ व्यवस्थापकांनी नेमणूक करून घेण्यासाठी आपला प्रयत्न राहील असे आश्वासन दिले. या वेळी आमदार थोरवे यांनी रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना संपर्क करीत तालुका व्यवस्थापकपदाची मागणी जिल्हा परिषदेकडून राज्य सरकारकडे केली आहे काय? अशी माहिती घेतली.

दरम्यान, कर्जत येथे सत्कार सोहळ्याच्या कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्यासाठी आलेले खासदार श्रीरंग बारणे यांची या समूह संसाधन व्यक्ती यांनी आमदार महेंद्र थोरवे यांच्या कार्यालयात भेट घेतली. त्या वेळी तालुक्यातील महिला समूह संसाधन व्यक्ती यांनी खासदार बारणे यांना ग्रामीण जीवनोन्नती अभियानासाठी पूर्णवेळ तालुका व्यवस्थापक मिळावा यासाठी साकडे घातले.

# प्लास्टिक हटवा, पृथ्वी वाचवा!

## प्लास्टिक बॅगमुक्त दिनानिमित्त मुरुडमध्ये रॅली



**मुरूड : प्रतिनिधी**

३ जुलै हा दिवस आंतरराष्ट्रीय प्लॅस्टिक बॅगमुक्त दिन म्हणून पाळला जातो. या दिनी हिंदू एज्युकेशन सोसायटी संचलित ओंकार विद्यामंदिर, मुरूडतर्फे मुख्याध्यापिका प्रविता गार्डी यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य जनजागृती फेरी शहरातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली.

मारूती नाका, गणेश आळी नाका, सार्वजनिक वाचनालय, बाजारपेठ, आझाद चौक, सरदार वल्लभ भाई पटेल रस्ता, मराठी शाळा क्र. १, बंदर रोडमार्गे काढण्यात आलेल्या फेरीत १९० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता. प्लास्टिक हटवा, पर्यावरण वाचवा, प्लास्टिकचा वापर टाळा, पृथ्वी वाचवा असा संदेश देणारे फलक मिरवित घोषणा देत विद्यार्थ्यांनी परिसर दणाणून सोडला आणि शहरवासीयांचे लक्ष वेधून घेतले.

# माणगावजवळ एसटी बसला धडकून दुचाकीस्वार जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**

भरधाव वेगाने येणाऱ्या दुचाकीची एसटी बसला धडक बसल्याने झालेल्या अपघातात दुचाकीस्वार जखमी होऊन दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. हा अपघात माणगाव तालुक्यातील भागाड गावच्या हद्दीत महाराष्ट्र सिमलेस कंपनीजवळ घडला. या अपघाताची फिर्याद शुभम गणेश गडेकर (वय २५, एसटी बसचालक, रोहा डेपो) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.



या अपघाताबाबत मिळालेली माहिती अशी की, दुचाकीचालक राजीव रंजन सिन्हा (वय ४०, पॉस्को कंपनी, विळे भागाड, माणगाव) हा त्याच्या ताब्यातील ॲक्टिव्हा स्कुटी (एमएच ४६ एव्ही १२७१) पुणे बाजूकडून माणगाव बाजूकडे भरधाव वेगाने चालवत घेऊन चालला होता. त्याने विरुद्ध दिशेला एसटी बसला (एमएच ०६ बीडब्लू ८४३९) धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वार राजीव जखमी झाला. दरम्यान, या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# पावसाने दडी मारल्याने भातलावणी खोळंबली

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

शेतकऱ्यांनी मृग नक्षत्राच्या मुहूर्तावर आपल्या शेतामध्ये भात पेरणी केलेली होती. पहिला पाऊस पडल्यानंतर भाताचा रुजवा चांगल्या प्रमाणात झाला होता, मात्र नंतर पाऊस गायब झाल्यामुळे भात रोपे करपून जातात की काय? अशी स्थिती निर्माण झाली होती, परंतु त्यानंतर पावसाने दमदार सुरुवात केली व भात रोपेदेखील लावणी योग्य झाली, पण मागील चार दिवसांपासून पावसाने दडी मारली आहे. दिवसातून एखाद छोटीशी पावसाची सर कोसळते. त्यामुळे भात लावणीची कामे खोळंबल्याचे पहायला मिळत आहे.

शेतामध्ये भरपूर पाणी व चिखल असल्याशिवाय भात लावणी करता येत नाही. समुद्र खवळलेला असला तरीही नैऋत्य मोसमी वाऱ्यांचा जोर कमी असल्याने पावसाचे प्रमाण कमी झाले आहे. अमावस्या ५ जूनला होती व याच दिवशी पुनर्वसू नक्षत्र निघत असून या नक्षत्राचे वाहन हत्ती हे आहे. त्यामुळे अमावस्येपासून तरी पाऊस चांगल्या प्रमाणात लागेल, अशी शेतकऱ्यांना आशा आहे. पावसाने दडी मारल्यामुळे हवेत उष्म्याचे प्रमाणदेखील खूप मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

# 'लाडक्या बहिणीं'ची तहसील कार्यालयात गर्दी

## ▪ महाडमध्ये योजनेस महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**महाड : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमध्ये लाभ मिळावा याकरिता अर्ज भरण्यास आणि अर्जदारास लागणाऱ्या कागदपत्रांसाठी महाड तहसील कार्यालयात लाडक्या बहिणींनी एकच गर्दी करीत आहेत. महिलांचा एसटी प्रवास अर्धे तिकीट करून एक चांगली योजना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महिलांना भेट दिली होती. यानंतर मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमुळे महिलांचा आनंद द्विगुणित झाला आहे.

राज्य शासनाने सुरू केलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी हजारो महिला एकाच वेळेस महाड तहसील कार्यालयात विविध दाखल्यांसाठी गर्दी केली आहे. यामुळे सेतू कार्यालय खासगी आपले सेवा केंद्र आणि बाँड रायटर्सकडे महिलांच्या रांगाच रांगा लागल्या आहेत. महिलांचा जाचक कागदपत्रांचा त्रास कमी करण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे यांनी लागणाऱ्या कागदपत्रांमध्ये दुसऱ्या दिवशी अटी शिथिल केल्या असल्या तरीदेखील महिलांची गर्दी काही कमी झालेली नाही.

अनेक महिलांनी विवाह झाल्यानंतर विवाह नोंदणी किंवा गॅझेट करून न घेतल्यामुळे शपथपत्र करून देणे गरजेचे आहे, तर अनेक महिलांकडे रहिवाशी दाखलेदेखील नाहीत. यामुळे शपथपत्र करून घेण्यासाठी तहसील कार्यालयात गर्दी होत आहे. महाड तहसील कार्यालयाने ही गर्दी कमी करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकात सर्व तलाठी आणि मंडळाधिकारी यांना एकत्रित बोलावून एकाच ठिकाणी दाखले देण्यासाठी सुविधा निर्माण केली आहे.

महिलांना अर्ध्या तिकिटात एसटी प्रवास ही योजना महाराष्ट्रात चांगलीच यशस्वी झाली असून महिला सक्षमीकरणचा भाग म्हणून महिलावर्गाचा प्रवास वाढला व यामुळे तोट्यात असलेली एसटीही फायद्यात आली. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनादेखील कमालीची लोकप्रिय होत असून महिलांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.



# मध्य रेल्वेच्या १५ कर्मचाऱ्यांना महाव्यवस्थापकांचा पुरस्कार

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राम करन यादव यांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात मुंबई विभागातील पाच, भुसावळ विभागातील सात, नागपूर विभागातील एक, पुणे विभागातील एक आणि सोलापूर विभागातील एक अशा १५ मध्य रेल्वे कर्मचाऱ्यांचा संरक्षा पुरस्काराने सत्कार केला.

डच्युटीदरम्यान या कर्मचाऱ्यांनी दाखवलेली सतर्कता, मागील महिन्यांत ट्रेन ऑपरेशन्समध्ये सुरक्षा सुनिश्चित करण्यात त्यांनी दिलेले योगदान, अनुचित घटना टाळण्यात त्यांचे योगदान या बद्दल हे पुरस्कार देण्यात आले. या पुरस्कारामध्ये पदक, प्रशंसा प्रमाणपत्र, अनुकरणीय संरक्षा कार्याचे प्रशस्तिपत्रक आणि दोन हजार रुपये असतात.



पुरस्कारप्राप्तमध्ये मुंबई विभागातील मंटू कुमार (ट्रॅक मॅनटेनर/अभियांत्रिकी, इगतपुरी), मुसाफिर कुमार (ट्रॅक मॅनटेनर/अभियांत्रिकी, इगतपुरी), रूप कुमार (किमॅन/ट्रॅफिक, भिवपुरी), सोमनाथ (फिटर/मेकॅनिकल, इगतपुरी), जितेंद्र (एमसीएम/मेकॅनिकल, वाडीबंदर); भुसावळ विभागातील भगवान भीमा (ट्रॅक मेंटेनर/अभियांत्रिकी, घोटी), गोविंद किशोर शर्मा (ट्रॅक मेंटेनर/अभियांत्रिकी, नवी अमरावती), गजानन वानखेडे (गेटमन/इंजिनीअरिंग, बोरगाव), दिलीप गुलाब (टेक्निशियन/मेकॅनिकल, खंडवा), मुकेश कुमार पंडित (तंत्रज्ञ/मेकॅनिकल, भुसावळ), एस. व्ही. माहूरकर (लोको पायलट (गुड्स/इलेक्ट्रिकल, भुसावळ), आनंद सागर (सहाय्यक लोको पायलट/इलेक्ट्रिकल, भुसावळ); नागपूर विभागातील (अहफाज खान, ईएसएम/एसटी, सेवाग्राम); पुणे विभागातील राजेश कुमार (ट्रॅक मेंटेनर/अभियांत्रिकी, कान्हेगाव); सोलापूर विभागातील विलास ठाकूर (टेक्निशियन/इलेक्ट्रिकल, उस्मानाबाद) यांना सन्मानित करण्यात आले.

महाव्यवस्थापक राम करन यादव आपल्या भाषणात पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या कर्तव्याप्रती सतर्कता आणि समर्पणाबद्दल त्यांचे कौतुक केले. ते म्हणाले की, अशा सतर्कता आणि शौर्याने इतरांना प्रवाशांच्या सुरक्षेसाठी प्रामाणिकपणे काम करण्यास प्रोत्साहन मिळेल.

या कार्यक्रमास प्रधान मुख्य सुरक्षा अधिकारी एम.एस. उप्पल, प्रधान मुख्य परिचालन व्यवस्थापक एस.एस.गुप्ता, प्रधान मुख्य अभियंता रजनीश माथूर, प्रधान मुख्य यांत्रिक अभियंता सुनील कुमार, प्रधान मुख्य सिग्नल व दूरसंचार अभियंता धरमवीर मीना उपस्थित होते.

# महाडमध्ये कृषी दिनानिमित्त पथनाट्य आणि रोपांचे वाटप

**महाड : प्रतिनिधी**

महाडमध्ये कृषी दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कृषी महाविद्यालय व कृषी विभागातर्फे छत्रपती शिवाजी चौक येथे जनजागृतीपर पथनाट्य तसेच वृक्षारोपण करण्यासाठी रोपांचे वाटप करण्यात आले.

श्री वीरेश्वर देवस्थानापासून सुरू झालेली कृषी दिंडी पर्यावरण रक्षणाच्या घोषणा देत महाड बाजारपेठ मार्गाने छत्रपती शिवाजी महाराज चौक ते भारतरत्न डॉ. बाबासाहे ओंडकर स्मारक चवदार तळे येथे निघाली. १ ते ७ जुलैदरम्यान महाडमध्ये वृक्षारोपण मोहीम राविण्यात येणार आहे. या वेळी शेतकऱ्यांना रोपे व कंपोस्ट खताच्या बॅग भेट देऊन गौरविण्यात आले. या कृषी दिंडीत सर्व शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.




# अल्पवयीन मुलींना फूस लावून पळवले

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील दोन अल्पवयीन मुलींना वेगवेगळ्या घटनांमध्ये अज्ञात व्यक्तींनी पळवून नेले. याबाबत पेण पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आल्या आहेत.

रिता राकेश सिंग यांची मुलगी अमृता (वय १७) ही शाळेत जाते असे सांगून घरातून गेली. ती परतलीच नाही. अमृताचा रंग सावळा, बांधा मध्यम उंची पाच फुट असून अंगात निळ्या रंगाचा टॉप, काळी जिन्स पॅन्ट, पायात चप्पल असे वर्णन आहे.

दुसरी घटना मायणी शेडाशी येथे घडली. पांडुरंग धोंडीबा पवार यांची मुलगी रोहिणी (वय १५) घरासमोर अंगणात बसलेली असताना निघून गेली. तिला कोणीतरी पळवून नेले. रोहिणीचा रंग गोरा, बांधा सडपातळ, उंची पाच फुट अंदाजे, अंगात मेहंदी रंगाचा कुर्ता, पांढरा पायजमा, पायात सॅन्डल आहेत.

# नमन नटवरा संगीत कार्यक्रम रंगला

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतच्या कलाकारांनी पनवेलमध्ये नमन नटवरा कार्यक्रम सादर केला. संस्कार भारती कोकण प्रांत, रायगड जिल्हा आयोजित नमन नटवरा ही नाट्यगीतांची मैफल सुरेल झाली. पनवेल येथील स्वर संवाद ग्रुप व कर्जतचे यशस्वी कलाकार यांनी नाट्यगीते सादर केली.



या कार्यक्रमाला संस्कार भारतीच्या कोकण प्रांताचे कार्याध्यक्ष तथा संगीत क्षेत्रातील मान्यवर पं. मुकुंद मराठे, संस्कार भारतीचे कोकण व गोवा प्रांताचे संघटक उदय शेवडे, कोकण प्रांताच्या उपाध्यक्षा सुनीता खरे, रायगड जिल्हा महामंत्री जयंत चेऊलकर, कोकण प्रांताचे सहमहामंत्री अमित चव्हाण उपस्थित होते. मान्यवरांचे हस्ते दीपप्रज्वलन व नटराज पूजन करण्यात आले. त्यानंतर संस्कार भारतीचे ध्येयगीत भारती म्हसे, माधुरी दिघे, सुरेखा शितोळे, दिनीती सावंत व उर्मिला जोशी यांनी सादर केले. रायगड अध्यक्ष पांडुरंग गरवारे यांनी स्वागत केले. नांदीने सुरुवात झालेला हा खूप छान व लोकप्रिय नाट्यगीतांचा प्रवास सुमारे अडीच तासाने भैरवीपर्यंत पोहचला. प्रत्येक गीतास रसिकांनी भरभरून टाळ्यांनी प्रतिसाद दिला. स्वर संवादचे कलाकार व कर्जतचे कलाकार यांनी बहारदार गीते सादर केली. शशिकांत पाटील यांनी प्रेमा सेवा शरण..., जयंत भागवत यांनी जय गंगे भागीरथी..., अमृता धारप यांनी प्रीतीचा कल्पतरु..., स्वाती कुलकर्णी यांनी खरा तो प्रेमा..., सई मराठे यांनी पाखरा जा..., संदीप केळकर यांनी पहा रे परमेश्वराची लीला..., बीना रेगे यांनी उजळीत जग..., हर्षाली जळे यांनी घेई छंद..., प्रतीभा दाबेकर यांनी देह देवाचे मंदिर..., मिलिंद काळेले यांनी काटा रुते कुणाला..., सुखदा घाणेकर यांनी कोण तुज सांग..., भाग्यश्री कर्वे यांनी नारायणा रमा रमणा..., सुशील अभंगे यांनी संगीत रस सुरस, व रवी मी..., मनोहर ठाकरे यांनी मर्म बंधातली ठेव ही..., स्नेहा गोगटे यांनी गर्द सभोवती रान साजणी..., सुचेता शिंदे यांनी विकल मना... व मुरलीधर श्याम... ही गीते सादर केली.

या गायकांना संवादिनी साथ नंदकुमार कर्वे व देवेंद्र मराठे, तबल्याची साथ गणेश घाणेकर व शार्दुल डोंगरे यांनी दिली. कार्यक्रमाचे निवेदन सुनिता खरे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार उर्मिला जोशी यांनी केले. या प्रसंगी प्रसाद पाटील, सुचिता वांजळे, श्रीराम फाटक, प्रकाश पटवर्धन, श्रीनिवास राव, ईश्वर आरेकर, विजय बेडेकर, अचला मेढी, अरविंद करमरकर, सायली कुंभार, साक्षी म्हसे आदी उपस्थित होते.

# भारताचा जगज्ज्ञेता संघ मायदेशी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने २०२४च्या टी-२० विश्वचषकाचे विजेतेपद पटकावले आहे. २९ जून रोजी झालेल्या अंतिम लढतीत दक्षिण आफ्रिकेचा सात धावांनी पराभव करीत भारताने तब्बल १७ वर्षांनंतर टी-२० विश्वचषकाचे जेतेपद पटकावले. या विजयानंतर भारतीय संघ गुरुवारी (दि. ४) भारतात परतला. दिल्ली विमानतळावर चाहत्यांनी विश्वविजेत्या खेळाडूंच्या स्वागतासाठी मोठी गर्दी केली होती.

एअर इंडिया स्पेशल चार्टर फ्लाइट बुधवारी स्थानिक वेळेनुसार पहाटे ४ वाजून ५० मिनिटांच्या सुमारास बार्बाडोसहून निघाले. १६ तासांच्या नॉन-स्टॉप प्रवासानंतर गुरुवारी सकाळी ६ वाजता हे विमान दिल्लीत पोहचले. प्रवासाचा वेळ खूप जास्त असला तरी त्याहून जास्त ऊर्जा भारतीय खेळाडूंमध्ये होती. बीसीसीआयने शेअर केलेल्या व्हिडीओमध्येसुद्धा स्पष्ट पहायला मिळतेय.

## दिल्लीत चाहत्यांनी केले दिमाखदार स्वागत





भारतीय खेळाडू, त्यांचे कुटुंबीय आणि सपोर्ट स्टाफसाठी बिझनेस क्लासमध्ये सोय करण्यात आली होती, परंतु कर्णधार रोहित शर्मा, उपकर्णधार हार्दिक पांड्या, सूर्यकुमार यादव, युझवेंद्र चहल, मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांच्यासह अनेकजण पत्रकारांशी गप्पा मारण्यासाठी इकॉनॉमी क्लासमध्येसुद्धा आले होते.

भारतीय संघ बुधवारी ग्रँटली अ‍ॅडम्स आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन विशेष विमानाच्या सहाय्याने दिल्लीला दाखल झाला. या वेळी भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्माकडे टी-२० विश्वचषकाची ट्रॉफी होती. दिल्ली विमानतळावरून भारतीय संघ आयटीशी मौर्या हॉटेलमध्ये दाखल झाला.

दरम्यान, भारतीय संघ दिल्लीत पोहचताच चाहत्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. भारतीय संघासाठी खास केक बनवण्यात आला होता. जगज्ज्ञेत्या संघाकडून हा केक कापण्यात आला.

# मुंबईकर खेळाडूंचा आज विधिमंडळात होणार सत्कार

**मुंबई : प्रतिनिधी**



भारतीय क्रिकेट संघाने तब्बल १३ वर्षांनंतर आयसीसी विश्वचषक स्पर्धा जिंकली. टी-२० मालिका जिंकून भारताचा जगज्ज्ञेता संघ गुरुवारी (दि. ४) भारतात परतला. दरम्यान भारतीय संघातील मुंबईकर खेळांडूचा महाराष्ट्राच्या विधिमंडळात सत्कार करावा, अशी मागणी शिवसेनेचे आमदार प्रताप सरनाईक यांनी विधानसभेत केली. विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनीही तत्काळ या मागणीचा सकारात्मक विचार करीत मुंबईकर खेळाडूंचा विधिमंडळात सत्कार करण्यास मान्यता दिली. या खेळाडूंना शुक्रवारी खेळाडूंना विधिमंडळात बोलावून सन्मानित करण्यात येणार आहे.

याबद्दल माहिती देताना आमदार प्रताप सरनाईक म्हणाले की, मुंबईकर खेळाडू आणि भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा, अंतिम सामन्यात ज्याच्या कॅचमुळे सामना फिरला तो सुर्यकुमार यादव, यशस्वी जयस्वाल आणि शिवम दुबे हे चारही खेळाडू मुंबईकर आहेत. त्याचा आम्हाला अभिमान आहे. ज्या प्रकारे २००७ आणि २०११ साली विश्वचषक जिंकल्यानंतर महाराष्ट्र सरकारने मुंबईकर खेळाडूंचा यथोचित सन्मान केला होता. त्याप्रमाणेच यंदाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईकर खेळाडूंचा सन्मान करायला हवा. या मागणीनंतर आता खेळाडू शुक्रवारी विधिमंडळात येणार आहेत.

सध्या राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील आमदार विधिमंडळात आलेले आहेत. भारतीय खेळाडूंचे कौतुक करण्यासाठी आमदार उत्सुक आहेत, अशी माहितीही आ. प्रताप सरनाईक यांनी दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वागत करण्याबाबत होकार दिला असून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनीही यासाठी हिरवा कंदील दाखविला. त्यामुळे शुक्रवारी त्यांच्या दालनात खेळाडूंचा सत्कार करण्यात येणार आहे.

# पंतप्रधान मोदींनी ‘ज्युनिअर’ बुमराहला घेतले उचलून; फोटो व्हायरल



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा टी-२० विश्वचषक विजेता संघ गुरुवारी (दि. ४) सकाळी दिल्लीत पोहचला. त्यानंतर सर्व खेळाडू पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी गेले आणि त्यांच्याबरोबर नाश्ताही केला. दरम्यान, जसप्रीत बुमराहने ‘एक्स’वर एक फोटो शेअर केला आहे, ज्यामध्ये तो त्याची पत्नी आणि पंतप्रधान मोदी दिसत आहे. एका फोटोत पंतप्रधान मोदींनी बुमराहच्या मुलाला कडेवर घेतलेले दिसत आहे.

भारतीय संघाचा स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहच्या मुलाचे नाव अंगद असून त्याचा जन्म ४ सप्टेंबर २०२३ रोजी झाला होता. जसप्रीत बुमराहने सोशल मीडियावर शेअर केलेल्या पोस्टच्या कॅप्शनमध्ये पीएम मोदींबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. बुमराहने लिहिले, आज सकाळी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी आमंत्रित होणे माझ्यासाठी खूप सन्मानाची गोष्ट आहे. या उत्साही क्षणांसाठी आणि पाहुणचारासाठी मोदी सरांचे खूप खूप आभार.

याआधी पंतप्रधान मोदींनी संपूर्ण भारतीय संघाची भेट घेतली, सर्व खेळाडू आणि सपोर्ट स्टाफसोबत फोटोशूट केले. त्याचबरोबर पंतप्रधान मोदींनी सर्व सदस्यांशी आपुलकीने संवाद साधला. त्याचबरोबर टी-२० विश्वचषक जिंकल्याबद्दल टीम इंडियाचे अभिनंदन करण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधी टीम इंडिया बार्बाडोसमध्ये असतानाही पंतप्रधानांनी फोनवर बोलून भारतीय खेळाडूंना दुसऱ्यांदा टी-२० विश्वचषकावर नाव कोरल्याबद्दल शुभेच्छा दिल्या होत्या.



# टीम इंडियाच्या विमानाला केला अनोखा ‘सॅल्युट’

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेचा पराभव करून टी-२० विश्वचषक उंचावला. विश्वचषक जिंकून क्रिकेट संघ गुरुवारी (दि. ४) मायदेशात परतला. दरम्यान, भारतीय संघाला घेऊन येणाऱ्या विमानाला मुंबई विमानतळावर अनोखा सलाम करण्यात आला.

कर्णधार रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली चॅम्पियन गुरुवारी सकाळी आधी नवी दिल्लीत पोहचले. नंतर तिथून मिरवणुकीसाठी मुंबईत दाखल झाले. टीम इंडियाला घेऊन येणाऱ्या विमानाला विमानतळावर मुंबई ‘वॉटर सॅल्युट’ देण्यात आला. या अनोख्या घटनेने साऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. दरम्यान, भारताच्या चॅम्पियन संघाला पाहण्यासाठी चाहत्यांनी एकच गर्दी केली होती.

# गॉफ, जाबेउर, श्वीऑटेकची पुढील फेरीत आगेकूच

**लंडन : वृत्तसंस्था**

अमेरिकेची दुसऱ्या मानांकित कोको गॉफने आपली लय कायम राखताना विम्बल्डन टेनिस स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत धडक मारली. यासह महिला एकेरीत ओन्स जाबेउर व अग्रमानांकित इगा श्वीऑटेकनेही पुढची फेरी गाठली. पुरुष एकेरीत स्टेफानोस त्सित्सिपास, कार्लोस अल्कराझ, मेदवेदेवने पुढच्या फेरीतील आपले स्थान निश्चित केले.

महिला एकेरीत गॉफने आपल्या दुसऱ्या सामन्यात रोमानियाच्या एन्का टोडोनीला ६-२, ६-१ अशा फरकाने पराभूत केले. सामन्याच्या सुरुवातीपासून आक्रमक खेळ करत गॉफने टोडोनीला पुनरागमन करण्याची संधी दिली नाही. पोलंडच्या श्वीऑटेकनेही अमेरिकेच्या सोफिआ केनिनला ६-३, ६-४ असे सरळ सेटमध्ये नमवत आगेकूच केली. तर, ट्युनिशियाच्या जाबेउरने जपानच्या मोयुका उचिजिमावर ६-३, ६-१ अशा फरकाने विजय नोंदवला.

## पुरुष एकेरीमध्ये त्सित्सिपास, अल्कराझ, मेदवेदेव पुढच्या फेरीत

पुरुष एकेरीच्या सामन्यात स्पेनच्या तिसऱ्या मानांकित कार्लोस अल्कराझने ऑस्ट्रेलियाच्या अलेक्सांदर वुकिचला ७-६ (७-५), ६-२, ६-२ असे सरळ सेटमध्ये नमवले. तर, डॅनिल मेदवेदेवने फ्रान्सच्या अ‍ॅलेक्झाडर म्युलेरवर ६-७ (३-७), ७-६ (७-४), ६-४, ७-५ असा विजय मिळवला. त्सित्सिपासने जपानच्या टारो डॅनिएलवर ७-६ (७-५), ६-४, ७-५ असा विजय साकारला. तर,इटलीच्या फॅबिओ फोगनिनीकडून नॉर्वेच्या कॅस्पर रूडला ६-४, ७-५, ६-७ (१-७), ६-३ असे पराभूत व्हावे लागले.








मुंबई : टी-२० विश्वचषक विजेत्या भारतीय संघाची क्रिकेटच्या पंढरीत निघालेल्या भव्य दिव्य मिरवणुकीची चित्रमय झलक.


















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com